MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष तेविसावे / अंक ८ / ऑगस्ट २०२२

## संपादकीय

### एक आगळावेगळा सत्कार सोहळा

मागील महिन्यात दहावीचा निकाल लागला. यात यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचे अनेक प्रकारे कोडकौतुक करण्यात आले. काही शाळांनी बक्षीस वितरण कार्यक्रम आयोजित करून मुलांना पारितोषिके दिली, तर काही शाळांनी गुणवंत विद्यार्थ्यांसाठी सत्कार समारंभ आयोजित केला. अशाच एका सत्कार समारंभाला हजर राहण्याची संधी मला मिळाली. मात्र हा सोहळा आगळावेगळा असाच होता. यातील सत्कारमूर्तींची वये असतील २५ ते ४५ वर्षे आणि त्यांनी मिळविलेल्या गुणांची टक्केवारी होती ५० ते ६० टक्के. याचे कारण हा सत्कार सोहळा सर्वसामान्य शाळेचा नसून एका रात्रशाळेचा होता.

मुंबईच्या शिवडी परिसरात एका महानगरपालिकेच्या शाळेच्या इमारतीत 'कीर्ती' रात्रशाळा भरते. सुमारे चाळीस वर्षांपूर्वी कोकणातील काही पुढारलेल्या व्यक्तींनी या शाळेची स्थापना केली. ज्या मंडळींना काही कारणाने शाळा मध्येच सोडावी लागली, अशा विद्यार्थ्यांची सोय करण्यासाठी ही रात्र शाळा काढण्यात आली. मागील चार दशकांत या शाळेतून अनेक गरीब विद्यार्थी शिकून पुढे आले. आजही ही शाळा गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण पुरवण्याचे काम करीत आहे. या शाळेत ८ वी ते १० वी पर्यंतचे वर्ग भरतात. शाळेची वेळ संध्याकाळी ७ ते रात्री १० अशी असते. या तीन तासांच्या अवधीत सगळे विषय शिकवावे लागतात आणि संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण करावा लागतो.

सत्कार सोहळ्याची सुरुवात रात्री आठ वाजता झाली. तेथे बसलेल्या विद्यार्थ्यांचे सरासरी वय तीस वर्षे होते. त्यामुळे मी विद्यार्थ्यांशी बोलायला आलो की, त्यांच्या पालकांशी असा संभ्रम मला झाला. शहरातील एखाद्या चांगल्या शाळेत गेलो, तर ९० टक्क्यांहून जास्त गुण मिळविलेल्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी असते. या गटात एवढे गुण मिळविणारे कोणीच नव्हते. यशस्वी विद्यार्थ्यांचे सरासरी गुण ५५ टक्क्यांच्या आसपास होते. तरीही त्यांच्या चेहऱ्यावरील समाधान पाहण्यासारखे होते. आपण एसएससी पास झालो याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्टपणे दिसत होता. टक्केवारीची स्पर्धा तिथे नाही हे आमच्या लगेच लक्षात आले.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या एकेका विद्यार्थ्यांची पार्श्वभूमी जाणून घेण्यासारखे होती. त्यातील काही विद्यार्थी दिवसभर हॉटेलमध्ये काम करून रात्री शाळेत येत असत. काही विद्यार्थी दिवसभर मोलमजुरी करून झाल्यावर शाळेत येत असत, तर काही विद्यार्थी आपला लहानसा व्यवसाय सांभाळून शिक्षण घेत असत. विशेष हे की, अनेक विद्यार्थी ॲम्बुलन्स चालक होते. त्यातील एक विद्यार्थिनी तर तामीळ भाषिक होती. तिनेदेखील एसएससी होण्यासाठी मराठी भाषा आत्मसात केली. या सगळ्या विद्यार्थ्यांमध्ये शिकण्याची दुर्दम्य इच्छा दिसून येत होती. आपल्या परिश्रमाला यश मिळाले याचे समाधान त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. सधन घरात सर्व सुविधा असलेल्या मुलाला किंवा मुलीला 'तू शाळेत जा' असा आग्रह करावा लागतो. त्याला शाळेत जाण्यासाठी वाहनाची सोय केलेली असते. शाळा झाल्यावर परत कोचिंग क्लासची सोय केलेली असते. त्यांच्या तुलनेत विचार करता रात्रशाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांची अवस्था फारच बिकट असे. तरीही शिकण्याची जिद्द बाळगून ही मंडळी शिक्षण घेत असतात. त्यांच्या जिद्दीला सलाम करावासा वाटतो.

मागील चाळीस वर्षांत या शाळेतून शिकून अनेक विद्यार्थी बाहेर पडले. त्यातील काही मंडळींनी आपला व्यवसाय सुरू केला आहे. तरीही ते शाळेला विसरले नाहीत. हे माजी विद्यार्थी शाळेच्या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहतात. शाळेला आणि शाळेतील विद्यार्थ्यांना काय हवे काय नको याची ते चौकशी करतात आणि आपल्या कुवतीप्रमाणे शाळेला मदत करतात. त्यांची उपस्थिती नवीन विद्यार्थ्यांना प्रेरणादायक ठरते. आपणदेखील यांच्यासारखेच पुढे जाऊ शकतो असा एक आत्मविश्वास त्यांच्या मनात निर्माण होतो. त्यांच्या जीवनात यशाच्या पायऱ्या चढण्यासाठी हा विश्वास त्यांना खूप उपयोगी पडतो.

१८५५ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले यांनी रात्रशाळेची सुरुवात केली. ब्रिटिश सरकारनेदेखील या कामाला हातभार लावला. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ही मोहीम चांगलीच फोफावली. महाराष्ट्र सरकारने या कामात पुढाकार घेऊन कामगार वस्तीत अनेक रात्रशाळा सुरू केल्या. मुंबई शहरातील गिरणगावात अशा अनेक शाळा सुरू करण्यात आल्या. काही खाजगी संस्थांनी रात्रशाळा सुरू करण्यात पुढाकार घेतला. त्यामुळे त्यांची संख्या वाढली. या शाळांना स्वतःची इमारत नसल्याने काही खाजगी तर काही महापालिका शाळांमध्ये यांना सामावून घेण्यात आले. असे जरी असले, तरी रात्रशाळांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. साधनांची कमतरता, प्रशिक्षित शिक्षकांची वानवा, कमी होत जाणारी विद्यार्थी संख्या या त्यांतील काही प्रमुख समस्या आहेत. शासनाने या बाबींकडे तातडीने लक्ष घालण्याची गरज आहे. नाहीतर कष्टकरी विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेला शिक्षणाचा हा मार्ग बंद पडू शकतो. ते होऊ नये यासाठी सर्वांनी एकत्र येण्याची गरज आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

●●●

व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष तेविसावे/अंक ८/ऑगस्ट २०२२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २७ वे/अंक २ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | श्रीपाद वल्लभ दिगंबरा | सहा. प्राध्यापक सुभाष गं. शिंदे | ३ |
| ३) | गुरुवर्य नरहर कुरुंदकरांचा वारसा... | डॉ. आनंद कुलकर्णी | ७ |
| ४) | 'रॉकेट्री - द नंबी इफेक्ट' देशभक्त संशोधकाची स्फूर्तिदायक कहाणी | राजेश कुलकर्णी | ११ |
| ५) | सत्तावीसशे वर्षांपूर्वी नागपूरनजीक होती समृद्ध औद्यागिक वसाहत...? | दिलीप नारायण वंडलकर | १७ |
| ६) | अनुवाद एक व्यवसाय-पर्याय | नरेंद्र गोळे | १९ |
| ७) | दहा-बारा शेंगा आणि आभाळभर आनंद | किरण वसंत पुरंदरे | २४ |
| ८) | परिसर वार्ता | संकलित | ३० |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# श्रीपाद वल्लभ दिगंबरा

*कलियुगातील दत्तात्रेयांचा प्रथम अवतार मानले गेलेले श्रीपाद श्रीवल्लभ यांच्याविषयी माहिती देणारा लेख – संपादक*

दत्त संप्रदाय हा हिंदू धर्मातील एक महत्त्वाचा संप्रदाय आहे. दत्तात्रेय ही देवता जनमानसात लोकप्रिय अशी देवता आहे. ब्रम्ह, विष्णू व महेश या तीन देवतांचा संगम म्हणजे दत्तात्रेय. त्यामुळेच दत्तगुरूंना तीन मुखे दाखविली जातात. ही तीन मुखे ब्रम्ह, विष्णू व शिव या तीन देवांची होत. परंतु महानुभाव पंथीयांचा दत्त हा एकमुखी दत्त आहे. तसेच महानुभाव पंथीय दत्तात्रेयाला कृष्णाचा अवतार मानतात. या पंथात पंचकृष्णाला पूजतात. असो, तर आपला मूळ मुद्दा होता की, दत्तात्रेय ही भारताच्या विविध भागांत पूजली जाणारी महत्त्वाची देवता आहे.

साधारणपणे मध्ययुगीन काळापासून पुन्हा एकदा दत्तात्रेय ही देवता व दत्तसंप्रदाय जनमानसामध्ये रुजू लागला व लोकप्रिय होऊ लागला असे म्हणणे वावगे ठरू नये. मध्ययुगात एक प्रकारे दत्तसंप्रदायाला सामान्य व्यक्तींपर्यंत नेण्याचे काम श्रीपाद वल्लभांनी केले असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. श्रीपाद श्रीवल्लभ हे दत्तात्रेयांचे पहिले मानवरूपी अवतार मानले जातात. त्यांचा जन्म सुमारे १३२० च्या आसपास पीठापूरम् (पीठापूर) येथे झाला. पीठापूरम् आंध्र प्रदेशातील काकीनाडा या जिल्ह्यात आहे. हा जिल्हा आंध्र प्रदेशातील समुद्रकिनारा लाभलेल्या एका जिल्ह्यांपैकी आहे. श्रीपाद श्रीवल्लभांचे आजीआजोबा हे मूळचे गुंटूर जिल्ह्यातील मल्याद्री गावचे होते असे सांगण्यात येते.

श्रीपाद श्रीवल्लभांनी वयाच्या सोळाव्या वर्षी संन्यास घेतला. त्यांनी भारतातील विविध तीर्थक्षेत्र स्थानी जाऊन देवदर्शन घेतले होते. यातील काही पवित्र स्थळे म्हणजे वाराणसी (बनारस काशी), बद्रीकाश्रम, श्रीशैलम् व कुरवपूर ही होत. वाराणसी हे शहर उत्तर प्रदेश या राज्यात गंगा नदीच्या तीरावर वसलेले आहे. हे शहर जगातील अतिप्राचीन शहरांपैकी एक मानले जाते. भगवान शिवाच्या भक्तांसाठी हे स्थान खास महत्त्वाचे आहे. येथे भगवान शिवाचा वास सदैव असतो अशी भाविकांची श्रद्धा आहे. वाराणसी वा काशी येथे फार पूर्वीच्या काळापासून भारताच्या वेगवेगळ्या भागांतून भक्तगण तीर्थयात्रेला येत असतात. काशीविषयी असे सांगितले जाते की, तेथे तेथील मूळचे लोक कमी व भारताच्या इतर भागांतून तेथे देवदर्शनासाठी आलेले लोकच जास्त आढळतात. बद्रीकाश्रम म्हणजे उत्तराखंड राज्यातील चांदोली जिल्ह्यातील बद्रीनाथ हे पवित्र तीर्थस्थळ होय. येथे भगवान विष्णूचे जगप्रसिद्ध असे मंदिर आहे. बद्रीनाथ हे ठिकाण अतिशय मोठ्या प्रमाणात भाविक येणारे एक तीर्थस्थळ आहे. बद्रीनाथ हे अलकनंदा नदीच्या काठावर आहे. या अनुषंगाने येथे एक महत्त्वाची माहिती द्यावीशी वाटते व ती अशी की, दक्षिण भारतातील व प्रामुख्याने तामीळनाडूतील वैष्णव परंपरेतील अलवार संतांनी लिहिलेल्या साहित्याप्रमाणे भगवान विष्णूची एकूण एकशे आठ पवित्र मंदिरे आहेत. तामीळ भाषेत या एकशे आठ स्थानांना ‘दिव्य देशम्’ वा ‘वैष्णव दिव्य देशम्’ असे म्हटलेले आहे. असे मानले जाते की, या एकशे आठ दिव्य देशमपैकी एकशे पाच भारतातील विविध भागांत आहेत, तर एक मंदिर नेपाळमध्ये व उरलेली दोन पवित्र ठिकाणे म्हणजे क्षीरसागर व वैकुंठ ही होत.

नाही हा शब्द तुम्हांला ऐकू येत नाही, तोपर्यंत सर्व काही शक्य आहे.

असो. तर आपला मुद्दा असा होता की, बद्रीनाथ धाम हे विष्णूच्या अतिपवित्र मानल्या गेलेल्या एका ठिकाणांपैकी एक असून तेथे श्रीपाद वल्लभ गेलेले होते. श्रीशैलम् हे पवित्र स्थळ सध्याच्या आंध्रप्रदेश या राज्यातील कर्नूल या जिल्ह्यात आहे. हे ठिकाण कृष्णा नदीच्या काठी असून मल्लिकार्जुन ज्योतिर्लिंग व शक्तिपीठासाठी प्रसिद्ध आहे. तसेच येथेच कर्दळीवन आहे. दत्तसंप्रदायात कर्दळीवनाचे अनन्य-साधारण महत्त्व आहे. याचे कारण म्हणजे या वनातच दत्तात्रेयांचे द्वितीय अवतार मानले गेलेले नृसिंह सरस्वती यांनी कर्दळीवनात जाऊनच आपली अवतारसमाप्ती केली व दत्तात्रेयांचे तिसरे अवतार मानले गेलेले श्रीस्वामी समर्थ तेथूनच प्रकट झाले असे दत्तभक्त मानतात. तर अशा या श्रीशैलम् येथे श्रीपाद श्रीवल्लभ गेलेले होते. आपण येथे कुरवपूरचा उल्लेख केला, त्यामुळे या ठिकाणाविषयीदेखील जाणून घेणे संयुक्तिक ठरेल. कुरवपूर हे तीर्थक्षेत्र कर्नाटक राज्यातील रायचूर या जिल्ह्यात कृष्णा नदीच्या किनाऱ्यावर आहे. कुरवपूरला कुरगुड्डी वा वल्लभपूरम् असेदेखील म्हटले जाते. या पवित्र ठिकाणी श्रीपाद वल्लभांनी बरीच वर्षे व्यतीत केली होती. असे म्हटले जाते की, ही जागा पूर्वीच्या काळी अग्रहार म्हणून दान दिलेली होती, असे संदर्भ आढळतात. अग्रहार म्हणजे ब्राह्मणाला धार्मिक कारणांसाठी दान दिलेली जमीन होय. या जमिनीपासून मिळालेले उत्पन्न तत्सम मंदिर वा देवस्थानाच्या देखरेखीसाठी वापरणे अभिप्रेत असे. कुरवपूर येथे एक जुना वटवृक्ष व औदुंबर तसेच श्रीपाद वल्लभांनी जेथे ध्यान केले होते, ती गुहा आहे.

दत्तात्रेय या देवतेचे वैशिष्ट्य म्हणजे या देवाला काही लोक विष्णूचा अवतार तर काही जण ब्रह्मा, विष्णू व भगवान शिवाचा संयुक्त अवतार मानतात. मात्र, बहुतांशी भक्तगण दत्तगुरूंना ब्रह्मा, विष्णू व शिव या तीन देवतांचा अंश असलेला त्रिमूर्ती अवतार मानतात. या संप्रदायाची एक विशेष ओळख अशी की, दत्तात्रयांचे अनेक अवतार होऊन गेले असे या पंथाचे अनुयायी म्हणतात. यातील दत्तात्रेयांचा कलियुगातील प्रथम अवतार म्हणजे श्रीपाद वल्लभांचा अवतार होय, असे मानले जाते हे आपण पाहिलेच आहे. दत्तगुरूंच्या या अवतारांचा संदर्भ स्कंद पुराणातदेखील येतो. स्कंद पुराणातील या अवतार पुरुषांचे नाव वल्लीनाथ असे होते व ते योगी होते असे अभ्यासक म्हणतात. असेही मत मांडले जाते की, वल्लीनाथांचे ठिकाण गुजरातच्या पश्चिम किनाऱ्यावर होते व ते नाथपंथीय होते. त्यांची उपासना केल्यावर व्यक्तीला योगीत्व प्राप्त होते व पशुधनात वाढ होते अशी धारणा असल्याचे जाणवते.

श्रीपाद वल्लभांचा जन्म आंध्र प्रदेशात झाला हे आपण पाहिलेलेच आहे. राजमुंद्रीपासून जवळ असलेले पीठापूरम् हे त्यांचे जन्मगाव. राजमुंद्रीचे पूर्वीचे नाव राजमहेंद्रवर्मन होते असे तज्ज्ञांचे मत आहे. पीठापूरमला प्राचीन इतिहास आहे. अभ्यासकांच्या मते पीठापूरमचा उल्लेख गुप्त घराण्यातील प्रसिद्ध सम्राट समुद्रगुप्त याच्या अलाहाबाद स्तंभलेखामध्ये आलेला असल्याचे निदर्शनास येते. या शिलालेखात समुद्रगुप्ताने पीठापूरमचा राजा महेंद्र याचा पराभव केल्याचा उल्लेख आढळतो. तसेच इसवीसनाच्या चौथ्या व पाचव्या शतकात कलिंग प्रदेशावर राज्य करणाऱ्या वशिष्ठ व मथरा या राजघराण्यांच्या शिलालेखांतदेखील पीठापूरचा उल्लेख येतो. एवढेच नव्हे, तर त्या काळात पीठापूरम व आंध्र प्रदेशचा उत्तरेकडील भाग तत्कालीन कलिंग राज्याचा भाग होता असे तज्ज्ञांचे मत आहे. नंतरच्या काळात इसवीसनाच्या सातव्या शतकात तत्कालीन प्रसिद्ध चालुक्य सम्राट दुसरा पुलकेशी याने पीठापूरम जिंकून घेऊन आपल्या साम्राज्याला जोडून घेतल्याचे निदर्शनास येते. पीठापूरम हे ठिकाण आंध्र प्रदेशातील पूर्व गोदावरीत असून याच्या आसपास काकिनाडा व राजमुंद्री ही दोन

शहरे वसलेली आहेत. पीठापूरम हे एक शक्तिपीठदेखील म्हणून ओळखले जाते. तर अशा या पीठापुरात श्रीपाद वल्लभांचा जन्म झाला. येथे अपळराज व सुमती नामक पती–पत्नी राहत असत. हेच श्रीपाद वल्लभांचे माता पिता होते. अपळराज हे वेदांतात उल्लेखिलेल्या आपस्ताम्ब या शाखेचे ब्राम्हण होते. श्रीपाद वल्लभांच्या जन्माबाबतची माहिती आपणास गुरुचरित्र या ग्रंथाच्या पाचव्या व सहाव्या अध्यायात वाचावयास मिळते.

श्रीपाद वल्लभांच्या जन्माविषयीची पुढील कथा आपणास दत्रगुरूंवर लिहिल्या गेलेल्या वेगवेगळ्या ग्रंथांमधून तसेच गुरुचरित्रात वाचावयास मिळते. अपळराज शर्मांच्या घरी एकदा श्राद्धाचे जेवण होते. त्या दिवशी पितृपंधरवड्यातील अमावस्या होती. अजून श्राद्धविधीची तयारीच चालू होती व दुपारची वेळ होती. अशा वेळी एक साधुपुरुष भिक्षा मागण्यासाठी अपळराज व सुमती मातेच्या द्वारावर आला व त्याने भिक्षा वाढण्यासाठी आवाज दिला. सुमती मातेने तत्काळ भिक्षुकास घरात शिजविलेले विविध अन्नपदार्थ भिक्षा म्हणून वाढले. मातेने जेव्हा भिक्षुकास भिक्षा वाढली, तेव्हा ब्राम्हणांचे भोजन झाले नव्हते. तरीदेखील सुमती मातेने भिक्षुकास भिक्षा दिली. याचे कारण साधारणतः दुपारच्या वेळेस साक्षात दत्तगुरू भिक्षा मागावयास येतात हे तिला माहीत होते. त्यामुळे तिला असे वाटले की, हा भिक्षुक काही सर्वसामान्य व्यक्ती नसून साक्षात दत्तात्रेय भगवान असावेत, म्हणून तिने ब्राम्हण भोज झालेले नसतानासुद्धा लागलीच भिक्षुकाला भिक्षा दिली. सुमती मातेने आदरपूर्वक तत्काळ भिक्षा दिल्यामुळे भिक्षुकाच्या रूपात आलेले दत्तगुरू प्रसन्न झाले. असे म्हटले जाते की, दत्तगुरूंनी सुमती मातेला आपल्या मूळ रूपात दर्शन दिले. हे मूळ रूप म्हणजे ब्रम्ह, विष्णू व शिवाच्या रूपातील त्रिमुर्ती स्वरूपातील होते. दत्तगुरूंनी दर्शन दिल्यानंतर सुमती मातेला वर मागण्यास सांगितले. सुमती मातेने या वेळी आपली व्यथा दत्तात्रेय भगवानांसमोर मांडली. सुमती मातेने भगवंतास एक सुदृढ व विद्वान आणि ज्ञानी संतान देण्याचा वर मागितला. याचे कारण मातेची संतान जगत नव्हती व जे दोन पुत्र झाले, त्यापैकी एक अंध तर दुसरी पंगू होती. भगवान दत्तात्रेयांनी प्रसन्न होऊन तत्काळ सुमती मातेस पुत्रप्राप्तीचा वर दिला. दत्तगुरूंनी हा वर देताना सुमती मातेस सांगितले की, 'तिला होणारा पुत्र महाज्ञानी तर असेलच मात्र तपस्वी मनोवृत्तीचादेखील असेल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे दत्त भगवान असे म्हणाले की, सुमती माता व अपळराजांनी त्याचे म्हणणे ऐकून राहावे लागेल अन्यथा तो त्यांना सोडून जाईल'. सुमती मातेने हा घडलेला प्रसंग अपळराजांना सांगितला परंतु तिला श्राद्धाच्या प्रसंगी ब्राह्मणांना भोजन देण्याअगोदर भिक्षुरूपी अतिथीला जेवण दिले याबद्दल काळजी वाटत होती. त्या वेळी अपळराजांनी सुमती मातेची समजूत घातली व त्यांच्या घरी साक्षात भगवान दत्तगुरूंनी अन्नसेवन केले याबद्दल आनंद व्यक्त केला. खरोखरीच दत्तगुरूंनी एखाद्याच्या घरी भोजनाचा आस्वाद घेऊन त्या घरातील व्यक्तीला वर देणे यासारखे दुसरे भाग्य नव्हे.

कालांतराने सुमती मातेस दिवस गेले व भाद्रपद शुद्ध चतुर्थीच्या दिवशी वा गणेश चतुर्थीच्या दिवशी तिने एका तेजस्वी पुत्राला जन्म दिला. या बालकाविषयी ज्योतिषांनी असे भविष्य वर्तविले की, हे सर्वसाधारण बालक नसून साक्षात दत्तगुरू आहे व हे जगाचे कल्याण करेल. अपळराज व सुमती मातेच्या या पुत्राचे नाव श्रीपाद असे ठेवण्यात आले. श्रीपाद हा साक्षात दत्तगुरुंचा अवतार होता. सुमती मातेने भगवंताला आपल्या–सारखाच पुत्र प्राप्त व्हावा हा मागितलेला वर दत्तात्रेयांनी तिला दिला होता व स्वतः:च तिच्या पोटी जन्म घेतला होता! याचे कारण श्रीपाद लहानपणापासूनच आपल्या ज्ञानरूपी प्रकाशाचा आनंद सर्वांना देत होता. वयाच्या

आठव्या वर्षी त्याची मुंज झाली. या लहान वयातच श्रीपाद आपल्या बुद्धिमत्तेची व विद्वत्तेची चुणूक दाखवू लागला. श्रीपादला लहानपणीच वेद, मीमांसा आदी विषयांमध्ये गती होती, नव्हे त्याला या गहन विषयांचे पूर्णपणे आकलन आणि ज्ञान होते.

श्रीपाद वल्लभ हे साक्षात दत्तात्रेयांचा अवतार असल्यामुळे त्यांना वैवाहिक जीवनात रस नव्हता. साधू व दैवी पुरुषांचे हेच वैशिष्ट्य असते की, वैवाहिक सुखात व संसारात त्यांचे मन मुळीच रमत नाही, नव्हे त्यांना इतर सामान्य व्यक्तींप्रमाणे या संसार पाशात न अडकता जगाचे व मानवी समाजाचे भले करावयाचे असते. त्यामुळे श्रीपाद वल्लभांनी विवाह न करता तीर्थयात्रेस प्रयाण करण्याचे ठरविले.

क्रमशः

**संदर्भ ग्रंथ**


- श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रांमृत: मूळ लेखक - श्री शंकर भट, अनुवाद - श्री हरिभाऊ निटुरकर (भाऊ महाराज)
- श्रीदत्त परिक्रमा: प्रा. क्षितिज पाटुकले
- श्रीगुरुचरित्र कथामृत: संपादक - कृष्णभक्त दिवाकर अनंत घैसास
- दत्तात्रय व इम्मॉर्टल गुरू, तोंडी, अँड अवतार अ स्टडी ऑफ द ट्रान्सफॉर्मेटिव अॅन्ड इन्क्लूसिव कॅरॅक्टर ऑफ अ मल्टी-फॅसेटेड हिंदू डेयिटी - अँटेनियो रिगोपूलस
- अक्कलकोट श्रीस्वामी समर्थ महाराजांची आद्य बखर- विवेक दिगंबर वैद्य ( संशोधन व संपादन)
- दारिद्र्य, दु:ख, संकटनाशक श्रीदत्त उपासना- प्रिया मालवणकर
- कर्दळीवन एक अनुभूती- प्रा. क्षितिज पाटुकले
- श्रीपाद श्रीवल्लभ चरित्रामृत- मूळ ग्रंथरचना - श्री. शंकर भट- अनुवाद- श्री हरिभाऊ जोशी निटुरकर
- श्री अक्कलकोटनिवासी श्रीस्वामी समर्थ चरित्र व कार्य - श्रीपादशास्त्री किंजवडेकर
- स्वामींची दिव्यानुभूती - प्रा. डॉ. यशवंतराव पाटील
- पुण्यभूमी नृसिंहवाडी: डॉ. बाळकृष्ण महादेव जमदग्नी व डॉ. सौ. मृणालिनी बाळकृष्ण जमदग्नी



**- सहा. प्राध्यापक सुभाष गंगाराम शिंदे**
उपप्राचार्य व इतिहास विभागप्रमुख
विप्रमंचे जोशी-बेडेकर कला व वाणिज्य
स्वायत्त महाविद्यालय, ठाणे (प) - ४००६०६
भ्रमणध्वनी - ९८२०३२८२२६
Email - subhashinscotlandgmail.com


•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहे.**

**- संपादक**

# गुरुवर्य नरहर कुरुंदकरांचा वारसा...

*दिनांक १५ जुलै रोजी गुरुवर्य नरहर कुरुंदकरांचा जन्मदिन साजरा केला जातो. त्यानिमित्त डॉ. आनंद कुलकर्णी यांचा लेख - संपादक*



आपल्या समाजात सर्वांच्याच सर्व प्रकारच्या अस्मिता टोकदार होताना आणि विवेकवादी विचार आक्रसत जाताना आपण कोणाचं बोट धरायचं किंवा कोणाचा वारसा स्वीकारायचा असा प्रश्न मला पडतो. जात, धर्म, संप्रदाय, भाषा आणि प्रांत अशा मुद्यांभोवती आपल्या अविवेकी अस्मिता वेगाने घट्ट होत जाताहेत. अशा काळात बुद्धिवादी विचार आणि तर्कनिष्ठ आकलन लुळेपांगळे होत जाणार हे ओघानेच आलं. आपण बुद्धिजीवी समाज म्हणून जुन्या विचारांचं आणि धारणांचं परिशीलन केलं पाहिजे. नव्या विचाराचा स्वीकार केला पाहिजे. नव्या संदर्भात एकूण जीवन व्यवहार आणि दृष्टीकोन याची चिकित्सा करायला शिकलं पाहिजे. आणि कुठल्याही विचारसरणीच्या साच्यात गोठून न जाता सतत विचारांच्या नव्या शक्यता शोधल्या पाहिजेत. हे मी लिहितोय तितकं सोप आणि सहज साध्य नाही, त्यासाठी विचारांच्या नकार आणि स्वीकाराची मोठी परंपरा असायला हवी. पाश्चात्त्यांकडे अशी विचार खंडण-मंडणाची आणि नव्या विचार शोधाची दीर्घ परंपरा आहे. फार मागे न जाता फ्रेडरिश नीत्शेपासून आपण सुरुवात केली; तरी मार्क्स, फ्रॉईड, विटेगस्टाईन, हायडेगर, सार्त्र, बख्तीन, फुको, हाबरमास, देरीदा, बार्थ, क्रिस्तेवा, ल्योयता, अगम्बेन अशी असंख्य नावं घेता येतील. या आणि अशा विचारवंतांनी जुन्या परंपरांची चिरफाड केली, प्रचंड वैचारिक उलथापालथ घडवून आणली. या लोकांनी परंपरेची आणि एकमेकांच्या विचारांची जबरदस्त चिकित्सा केली. नीत्शे रुसोची चिकित्सा करतो, हाबरमास देरीदाची चिकित्सा करतो आणि फुको एकूण पाश्चात्त्य ज्ञानपरंपरेची चिकित्सा करतो. पण अशा प्रकारची चिकित्सा आपल्याकडे घडत नाही. आपण परस्परांना घट्ट धरून बसतो, नव्याला सतत नाकारतो. प्रस्थापित विचारांना उगाळत राहतो आणि वेगळ्या विचारांची मुस्कटदाबी करतो. आपण व्यक्तिपूजक आहोत, भावनांच्या लाटेवर वाहत जाणारे आहोत. त्यामुळे आपल्याला चिकित्सा नको असते. यांतून वैचारिक पळवाट म्हणून आपण छोटे कंपू तयार केले आहेत. मग अशा कंपूंनी आपापल्या वैचारिक सोयीच्या आणि हितसंबंध जपणाऱ्या चौकटी तयार केल्या. त्यात आपण फिट बसलो, तर आपला उदो उदो आणि मिसफिट झालो, तर मग आपण दखलपात्रही उरत नाही. जणू माणसांना स्वतंत्र विचार नसतोच. सतत तडजोडी करत प्रकाशात राहणं ही आपली एकंदर बौद्धिक समज आणि गरजही असते. 'माझ्या गळा तुझ्या गळा' असा एकंदर प्रकार असतो. वेगळ्या आणि उंच स्वरात बोलणं अमान्य असतं. अशा अचिकित्सक आणि अतार्किक वातावरणात आपण कोणाची वाट

धरायची असा मला प्रश्न पडतो. मग मला उत्तर मिळतं- गुरुवर्य नरहर कुरुंदकरांची.

लहानपणी त्यांच्याविषयीचे स्तीमित करणारे किस्से मी ऐकले होते. परीक्षेची त्यांना चीड होती म्हणून एम. ए. ची परीक्षा झाल्यावर डोक्याचा गोटा करून त्यांनी परीक्षेच्या नावाने आंघोळ केली. विद्यार्थी असतानाच त्यांची पुस्तके बी.ए. आणि एम.ए. च्या अभ्यासक्रमाला होती, घर ते कॉलेज आणि परत घर असं चालत असतानाही ते पुस्तक वाचत असत, असे अनेक किस्से ऐकून त्यांच्याविषयी विलक्षण आकर्षण वाटायचं. स्पष्टवक्ते असल्यामुळे अनेक प्रसंगांत त्यांनी अनेक मान्यवरांची कशी भंबेरी उडवली होती याचेही अनेक किस्से ऐकले होते. प्राथमिक शिक्षक ते प्राचार्य पदापर्यंत त्यांचा प्रवासही असाच होता. अशी माणसं काय विचार सांगतात हे कळत नसलं की, भोवतालची लोकं त्यांच्याभोवती रंजक किश्श्यांचा गोफ विणतात. कारण त्यांच्या विचित्र वागण्यातल्या गमतीजमती आपलं मनोरंजन करतात. त्यातच आपल्याला रस असतो. त्यांचे विचार आपल्याला सोसत नाहीत कारण त्यात बदल अपेक्षित असतात. मी दहा वर्षांचा असतानाच त्यांचं दु:खद निधन झालं. त्यामुळे मी त्यांना प्रत्यक्ष कधी भेटू शकलो नाही आणि ऐकूही शकलो नाही. बी. ए. करत असताना कुरुंदकरांचं 'धार आणि काठ' पहिल्यांदा वाचलं. ही माझी आणि त्यांची पुस्तकरूपाने झालेली पहिली भेट. अर्थात हे एक बरं झालं की, हे पुस्तक साहित्य समीक्षेशी संबंधित होतं. यांतील लेखात कुरुंदकरांनी मराठीतील ह. ना. आपटे, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, श्री. ना. पेंडसे यांच्यासारख्या लेखकांच्या कादंबऱ्यांची विलक्षण चिकित्सा केली आहे. तेव्हा मला हे फार काही समजलं नाही. नंतर त्यातील समीक्षेची वेगळी दृष्टी उमगत राहिली. समीक्षक म्हणून कुरुंदकर मूल्यमापनाची कसोटी किती काटेकोर आणि तर्कशुद्धपणे साहित्यकृतींना लावायचे याचा वस्तुपाठ म्हणजे हे पुस्तक आहे. मराठी वाङ्मयावर क्ष-किरण टाकणाऱ्या अशोक शहाणे यांचं मराठी वाङ्मयाविषयीचं विवेचन म्हणजे मूल्यमापनाची चुकलेली कसोटी आहे असा निर्वाळा कुरुंदकर यात देतात. सार्त्र, काफ्का, कामू अशा युरोपियन लेखकांबरोबर मराठी लेखकांच्या कादंबऱ्यांची तुलना अनाठायी आणि चुकीची आहे असं त्यांचं निरीक्षण आहे आणि याचं अतिशय तर्कशुद्ध कारणही ते देतात. त्यांच्यामते वाङ्मयाचा तौलनिक अभ्यास नसतो, तो आकलनाच्या सोयीसाठी असतो. तुलनाच करायची, तर शरदचंद्रांच्या कादंबऱ्यांबरोबर करणं संयुक्तिक ठरेल असा त्यांचा निर्णय आहे. विशेष म्हणजे हे मुळात चाळीस पानांचं ट्युटोरीयल होतं, पुढे त्याचं पुस्तक झालं. त्यांचं 'थेंब अत्तराचे' हे पुस्तकही मला खूप आवडलं होतं. कुरुंदकरांनी विविध कविता संग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावना या पुस्तकात आहेत आणि कवितांचं परीक्षण आहे. नंतर सावकाशीने त्यांची इतर पुस्तके वाचत गेलो- शिवरात्र, जागर, अभयारण्य, आकलन, अन्वय, रंगशाळा, रूपवेध, व्यासशिल्प, वाटा माझ्या तुझ्या, इ. खरं तर कुरुंदकरांच्या पुस्तकांमध्ये डावं-उजवं करणं खूप अवघड आणि अन्यायकारक आहे. पण मला व्यक्तीश: त्यांचं 'अभयारण्य' सर्वाधिक आवडतं. यात कुरुंदकर त्यांच्या विश्लेषणक्षमतेचं टोक गाठतात. जणू चिकित्सेची पोतडीच उघडलीये आणि त्यातून विचारांचे मोती बाहेर पडत राहतात. यांतील सोळा लेख स्वातंत्र्य या संकल्पनेवर भाष्य करतात. एखाद्या संकल्पनेकडे संपूर्णपणे वेगळ्या दृष्टीकोनातून कसं बघावं याचं दिग्दर्शन कुरुंदकर यांत करतात. स्वातंत्र्याची त्यांची चिकित्सा इतकी मुलगामी आणि अपारंपरिक आहे की, आपण झाक देरीदा या फ्रेंच तत्त्वज्ञाचं 'लोकशाही' संकल्पनेवरचं विवेचन वाचतोय असं मला वाटत राहतं. स्वातंत्र्य म्हणजे काय याचं विवेचन करताना ते साधारणपणे भावरूप किंवा अभावरूप आहे असंच सांगितलं जातं. भावरूप म्हणजे स्वातंत्र्याचं

अस्तित्व आणि अभावरूप म्हणजे बंधनाचा अभाव. पण कुरुंदकर वेगळं आणि अपारंपरिक विवेचन करतात. त्यांच्यामते स्वातंत्र्य हे मूळचे स्वाभाविक आणि नैसर्गिक; बंधने ही नंतरची अस्वाभाविक आणि अनैसर्गिक व म्हणून अयोग्य. स्वातंत्र्य संकल्पनेवर यापेक्षा मूलगामी विधान काय असू शकतं?

चर्चा आणि चिकित्सांच्या मुळे प्रीती आणि आदर कमी होत नसतो, तो डोळस होत असतो. आपले राष्ट्रनेते कोणी अजस्र शक्तीचे राक्षस नव्हते; किंवा ते नवीन सृष्टी घडविणारे परमेश्वर नव्हते. अफाट कर्तृत्व, न संपणारी जिद्द आणि विशाल बुद्धिमत्ता असणारी पण तुमच्या-माझ्याप्रमाणेच याच मातीतून जन्माला आलेली, गुणदोषमर्यादांनी युक्त असणारी उत्कट, जिवंत माणसे होती. त्यांच्या दगडी देवमूर्ती करून त्यांची खोटी पूजा करणे यात अर्थ नव्हता. सर्व थोर व्यक्तींकडे बघण्याचा कुरुंदकरांचा दृष्टीकोन असा अतिशय समकालीन, पूर्णपणे अपारंपरिक होता. त्यांच्यालेखी सर्व माणसेच. त्यामुळे देवत्व देण्यास आणि व्यक्तिपूजा करण्यास त्यांचा प्रखर विरोध होता. तर्कशुद्ध चिकित्सा हेच आकलनाचं माध्यम आहे असा त्यांचा ठाम विश्वास होता. आता विचारसरणीचे मठ स्थापन करून बसलेल्या विद्वानांना आणि अनुयायांना असा दृष्टीकोन आणि अनवट चिकित्सापद्धती कशी झेपणार आणि पचनी पडणार? व्यास, वाल्मिकी, बुद्ध, शंकराचार्य ही आपल्यासारखी माणसेच आहेत. जे त्यांना जमतं, ते आपल्यालाही जमलं पाहिजे असा त्यांचा प्रचंड बौद्धिक आत्मविश्वास बघून आपण बार्थ किंवा फुको वाचतोय याचा भास होतो. लोकहितवाद्यांपासून मौलाना आझाद आणि नेताजी सुभाषचंद्र बोस अशा अनेकांची चिकित्सा कुरुंदकर करतात. राष्ट्रवाद, धर्मनिरपेक्षता, राजकारण, कलेतील स्वातंत्र्य अशा असंख्य विषयांवर त्यांचं विश्लेषण वाचणं म्हणजे वास्तवाचं आरपार दर्शन असतं. धार्मिक कट्टरतावाद मग तो हिंदूंचा असो की मुस्लिमांचा तो कसा घातक आहे यांवर त्यांनी 'शिवरात्र' पुस्तकात परखड टीका केली आहे. हाती घेतलेल्या विश्लेषणात कशाचाही मुलाहिजा न ठेवता तर्क आणि बुद्धिवादाच्या कसोटीवर चकीत करणारे निष्कर्ष कुरुंदकर मांडतात. आपण असा विचार का केला नाही याचं आपल्याला आश्चर्य वाटतं, असा संपूर्णपणे वेगळा विचार करता येतो याचा विस्मय वाटतो आणि नव्या शक्यता गवसल्याने आनंद होतो. मला त्यांची लेखनशैली प्रचंड भावते. भाषेच्या वापरात एखाद्या पंडिताला शोभेल अशी शब्दरचना कुरुंदकर करतात. ती बोजड नाही, पण विचाराला प्रवृत्त करणारी आहे. त्यात कोरडेपणा आणि निरर्थक शब्दफुलोरा नसतो. चपखल उदाहरणे देऊन प्रतिपाद्य विषय वाचकांपर्यंत पोचवण्यात ते यशस्वी होतात. त्यांचा आशय मात्र तर्ककठोर असतो, त्यात भावनेला थारा नसतो. इथे वाचकांची परीक्षा असते. कशाला तरी कवटाळून बसायची पारंपरिक सवय आपल्याला आहे. कुरुंदकरांचा आशय अशा मनोधारणेला उभा छेद देतो, आपल्यासाठी नव्या विचारांचं विश्व खुलं करतो. यांत वाचकांची पुन्हा अडचण अशी की, कुरुंदकर कोणत्याही विचारधारेचं समर्थन करत नाहीत. ते स्वत:ला कशाशी बांधून घेत नसल्याने आपण कशाच्या आधाराने त्यांच्याबरोबर विचार प्रवाहात जावं हे उमगत नाही. कुरुंदकर अथांग विचार प्रवाहात खूप पुढे जाऊन आपल्याला खुणावत राहतात. आपल्याला त्यांच्यासोबत जायचं, तर दमछाक होते. ते नास्तिक होते आणि पक्के विज्ञानवादी होते. साहजिकच कशावरही आणि कोणावरही त्यांची देवभोळी श्रद्धा नव्हती, पण 'संविधानावर माझी श्रद्धा आहे' असं ते सांगत. यासोबतच मानवता आणि मानवतेच्या उज्ज्वल भवितव्यावरही त्यांची श्रद्धा होती. विशेष म्हणजे ते पोथिनिष्ठ विद्वान नव्हते. याचा अर्थ हा की, ज्ञानाच्या बाबतीत त्यांचा एखादा आवडता वैचारिक आखाडा नव्हता आणि ते पारंपरिक तात्त्विक धारणांना थेट आव्हान द्यायचे. मला

व्यक्तिश: त्यांचा हा विशेष खूप आवडतो. धर्मातील श्रद्धेचं सोडा, ज्ञानक्षेत्रातील साचेबंद श्रद्धेलाही त्यांचा स्पष्ट विरोध होता आणि असा विरोध मुखर करायला कुरुंदकर कधीच कचरले नाहीत.

मला कुरुंदकरांविषयी अत्यंत जिव्हाळा आहे तो त्यांच्या अफाट व्यासंगामुळे, चिकित्सक वृत्तीमुळे आणि निर्भीड मतप्रदर्शनामुळे. अगदी प्राथमिक पातळीवरच बोलायचं, तर कुरुंदकर मराठवाड्यातील आहेत ही माझ्यासाठी प्रादेशिक जवळीक आहे. मराठवाड्याचा वैचारिक अनुशेष कुरुंदकरांनी अवघ्या पन्नास वर्षांच्या आयुष्यात भरून काढला म्हणून ही जवळीक. पण त्यांचं वेगळेपण सुरू होतं ते त्यांनी अभ्यासपूर्वक प्रादेशिक सीमा ओलांडल्यानंतर. साहित्य, कला, तत्त्वज्ञान, शिक्षण, इतिहास, संगीत, राजकारण अशा अनेक गोष्टींचा त्यांचा थक्क करणारा अभ्यास आहे. बर हा नुसता पुस्तकी व्यासंग नसतो, तर त्यात चिकित्सक वृत्ती असते. कुरुंदकर खूप मोठ्या माणसांची चिकित्सा करायला घाबरत नाहीत. माणसांच्या आणि विचारांच्या मर्यादा दाखवत ते आपल्याला सतत काळाबरोबर पुढे नेत राहतात, आकलनाच्या नव्या वाटा दाखवत राहतात. कुरुंदकर भरताच्या नाट्यशास्त्रावर लिहितात, शंकराचार्यांचा विवर्तवाद नाकारतात, काँग्रेस पक्ष हा हिंदूंचा पक्ष आहे असं मत मांडतात, हिंदूंना सेक्युलर व्हायला सांगतात, गांधींची आणि फाळणीची चिकित्सा करतात, स्वातंत्र्य संकल्पनेचं दीर्घ विश्लेषण करतात, मार्क्सवादाच्या मर्यादा उघड करतात. अशी चिकित्सा करताना ते कोणाचेही नसतात. आपण कोणत्याही विचारसरणीचा आजन्म वाहक व्हायचं नाही याची ते पुरेपूर काळजी घेतात. त्यांची बांधिलकी तर्क, विवेक आणि हाती घेतलेल्या विषयाच्या चिकित्सेशी असते. ते सर्वांची चिकित्सा करत दोष दाखवून देतात. अशा चिकित्सेत कोणी दुखावला, तर त्याची त्यांना फिकीर नसते. कारण त्यांना पद, प्रतिष्ठा, पैसा यांपैकी काहीही नको असतं. चिकित्सक बुद्धी गुंडाळून ठेवून ते कोणाच्याही वळचणीला जात नाहीत. असा निर्भीड चिकित्सा करणारा माणूस सगळ्यांची गैरसोय करतो. मग हिंदुत्ववाद्यांना ते नको असतात, मार्क्सवादी आणि पुरोगाम्यांना ते अडचणीचे ठरतात.

कुरुंदकर समजून घ्यायचे, तर आधी त्यांना situate करायला लागतं आणि काही केल्या कुरुंदकरांचे लिखाण असं situate होतं नाही. मग एकतर त्यांच्या मोठेपणाची आरती गाणं, त्यांच्या विक्षिप्तपणाचे किस्से सांगणं, नाही तर वरवरचं वाचून भाष्य करणं एवढचं हाती उरतं. कुरुंदकर कोणत्याही idology त अडकत नाहीत. ते शोधक आहेत आणि चिकित्सकही आहेत. स्वत:च्या सोयीच्या आणि लोकानुनयी भूमिका ते घेत नाहीत. वाचकांच्या मनातील धारणांना सतत धक्के देऊन विचारप्रवृत्त करणं हे त्यांचं कामं आहे. पण म्हणून ते अनावश्यक मूर्तिभंजनही करत नाहीत. ते वाचकांना आपल्यासोबत घेतात, सत्यान्वेषण करायला लावतात आणि त्यांची मतं स्वीकारायची की नाही याचं पूर्ण स्वातंत्र्य वाचकाला देतात. त्यांची चिकित्सापद्धती फार अनवट आहे. ती तुम्हांला त्यांच्या मतांशी लगट करू देत नाही, पण सुरक्षित अंतरावरून न्याहाळायला मदत करते. एखादा आपल्या मनातील रुजलेला पण अव्यक्त मुद्दा त्यांच्या लिखाणात येतो. त्याचा आनंद घेईपर्यंत दुसरा त्याला काटशह देणारा फटकारा येतो आणि आपण भानावर येतो. स्वीकार–नकार तुमचे तुम्ही ठरवायचे. पण तोपर्यंत कुरुंदकरांनी तुम्हांला अस्वस्थ केलेलं असतं हे नक्की. कुरुंदकर तुम्हांला मतांवर आरुढ होऊ देतं नाहीत, मतांची चिकित्सा करायला लावतात. हे अवघड असतं; स्वत:चं परीक्षण करण्यासारखं असतं. बाळबोधात सगळ्यांचा निर्धोक स्वीकार करायची

(पृष्ठ क्र. २३ वर)

# 'रॉकेट्री - द नंबी इफेक्ट' देशभक्त संशोधकाची स्फूर्तिदायक कहाणी

*ज्येष्ठ रॉकेट वैज्ञानिक नंबी नारायणन त्यांच्या जीवनावर नुकताच 'रॉकेट नंबी इफेक्ट' हा चित्रपट प्रदर्शित झाला. इस्रोमध्ये महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळलेल्या या संशोधकावर झालेल्या अन्यायावर तसेच या चित्रपटावर प्रकाश टाकणारा ज्येष्ठ लेखक राजेश कुलकर्णी यांचा लेख - संपादक*

एखाद्याला आयुष्यातून उठवेल अशा अन्यायाची किती उदाहरणे आपल्याला माहीत असतात? त्यातही आपल्या आजूबाजूच्या कोणावर असा अन्याय झाला असेल, तरच आपण सहसा त्याची विशेष नोंद घेतो. अपवाद असतो निर्भयावर झालेल्या अत्याचारासारख्या प्रकरणांचा. अशा प्रकरणातील क्रौर्यामुळे आपल्याही पोटात ढवळून निघते. इस्रोचे माजी शास्त्रज्ञ नंबी नारायणन यांना आयुष्यातून उठवणाऱ्या अन्यायाची माहिती मात्र फारच थोड्या जणांना असते.



भारताचे अनेक अणुशास्त्रज्ञ व अवकाश-शास्त्रज्ञ गेल्या काही दशकांमध्ये अतिशय रहस्यमय पद्धतीने मृत्युमुखी पडलेले आहेत. डॉ. होमी भाभांचा वयाच्या ५७व्या वर्षी १९६६मध्ये विमान अपघातात झालेला मृत्यू, १९७१मध्ये वयाच्या ५२व्या वर्षी भारताच्या अंतरिक्ष कार्यक्रमाचे प्रमुख विक्रम साराभाई यांचा तिरुवनंतपुरमजवळील एका रिसॉर्टमध्ये झालेला मृत्यू, १९९९मध्ये इस्रोच्या विक्रम साराभाई अंतरिक्ष संशोधन केंद्राचे संचालक डॉ. एस. श्रीनिवासन यांचा वयाच्या ५८व्या वर्षी झालेला अकस्मात मृत्यू ही याची काही प्रमुख उदाहरणे. याव्यतिरिक्त इस्रोचे ज्येष्ठ शास्त्रज्ञ प्रा. तपन मिश्रा यांच्यावर २०१७ मध्ये व २०१९मध्ये घातक विषप्रयोग झाले. या ज्येष्ठ शास्त्रज्ञांव्यतिरिक्तही इतर अनेक शास्त्रज्ञांचे झालेले अनेक रहस्यमय मृत्यू अद्याप अनुत्तरित आहेत. याबाबतची आकडेवारी वेळोवेळी उपलब्ध करून दिली जात असली, तरी याच्या मुळाशी जाण्याचा गंभीर प्रयत्न आजवर कधी झाल्याचे दिसलेले नाही. त्यामुळे देशातील अतिमहत्त्वाच्या संशोधन क्षेत्रातील शास्त्रज्ञांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न अस्तित्वात आहेत. प्रा. मिश्रा यांच्या सांगण्याप्रमाणे भारतविरोधी शक्तींना अनुकूल वाटणाऱ्या अधिकाऱ्यांना बढती मिळावी, यासाठी सेवाज्येष्ठतेत फायदा व्हावा याकरिता किंवा जे अधिकारी भारताच्या या क्षेत्रांमधील प्रगतीमुळे इतर देशांच्या हितसंबंधांच्या आड येतील असे वाटते, त्यांना आपल्या मार्गातून दूर करण्यासाठी हे मृत्यू घडवले जातात. इस्रोच्या क्रायोजेनिक्स विभागाचे प्रमुख असलेल्या नंबी नारायणन यांना १९९४मध्ये हेरगिरीच्या प्रकरणात अडकवण्याचा झालेला प्रयत्न अशाच स्वरूपाचा होता. त्यांच्या कहाणीवर बनवलेला 'रॉकेट्री - द नंबी इफेक्ट' हा चित्रपट सध्या चर्चेत आहे. चित्रपट बनवण्याची कल्पना प्राथमिक अवस्थेत असताना नारायणन यांच्याशी झालेल्या चर्चेदरम्यान निर्माता-दिग्दर्शक आर. माधवन याच्या लक्षात आले की,

नारायणन यांची इस्रोमधील कारकिर्द अतिशय विलक्षण अशी होती. त्यामुळे चित्रपटाच्या कथानकाचा आवाका वाढला.

आजवर भारतासाठी अतिशय महत्त्वाच्या अशा अंतराळ संशोधनातील महत्त्वाच्या कामगिरीकडे भारतीय चित्रपटसृष्टीचे लक्षच गेले नव्हते. नाही म्हणायला अलीकडेच आलेला मंगलयान मोहिमेवर आधारित एक चित्रपट कथेशी प्रामाणिक न राहिल्यामुळे व मनोरंजनामध्ये वाहवत गेल्यामुळे निष्प्रभ ठरला होता. तो केवळ वाहत्या गंगेत हात धुऊन घेण्याचा प्रकार होता. स्वत: माधवन याने सांगितल्याप्रमाणे ज्या चित्रपटामध्ये हाणामारी नसेल, प्रणयप्रसंग नसतील, गाणी नसतील; त्यासाठी अर्थपुरवठा करण्यास कोणता निर्माता तयार होईल? अनंत महादेवन या दिग्दर्शक-अभिनेत्याने नारायणन यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडणारा 'विचहंट' हा चित्रपट बनवण्याचे दहा वर्षांपूर्वीच जाहीर केले होते. मोहनलाल या प्रसिद्ध अभिनेत्याचे नावदेखील त्याकरिता ठरवले गेले होते. स्वत: नारायणन यांनी या चित्रपटासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करण्याचे मान्य केले होते. मात्र काही कारणांनी त्या चित्रपटाचे काम पुढे जाऊ शकले नाही. अशा प्रकारे या विषयावरील चित्रपटाबाबत 'आधीच उल्हास, त्यात फाल्गुन मास' असा प्रकार घडला. पुढे माधवन याने ही जबाबदारी स्वीकारल्यावर, वर उल्लेख केल्याप्रमाणे कथेचा आवाका वाढला. त्यातच अनंत महादेवन याने कार्यबाहुल्यामुळे चित्रपटाचे दिग्दर्शन करण्यास ऐन वेळी असमर्थता दर्शवल्यानंतर ती जबाबदारीही माधवन याच्यावर येऊन पडली. अर्थातच तोच निर्मातादेखील. अशा अनेक अडचणी येऊनही माधवन याने केवळ कर्तव्य म्हणून हा चित्रपट पूर्ण करण्याचे ध्येय समोर ठेवले आणि ते पूर्ण केलेदेखील.

आर. माधवन हे राहुल द्रविड म्हणा किंवा मॅट डेमन यांच्याप्रमाणे अनेकांचे लाडके व्यक्तिमत्त्व आहे. थिल्लरपणात न गुंतणारे, सभ्य आणि कोणत्याही वादात नसणारे. चित्रपटसृष्टीत प्रचंड यश मिळवलेले असूनही त्याच्या बोलण्यात अहंगंडाचा लवलेशही जाणवत नाही. त्याने चित्रपटामध्ये नारायणन यांच्या तरुण आणि वयस्कर दोन्ही भूमिका लीलया पेलल्या आहेत. इंग्लिश, हिंदी व तामीळ अशा तीन भाषांमध्ये हा चित्रपट बनवण्यात आला आहे. चित्रपटाच्या निर्मितिमूल्याबाबत कसलीही तडजोड न केल्याचे दिसते.

माधवन याला दिग्दर्शनाचा कोणताही पूर्वानुभव नव्हता. चित्रपटाच्या कथानकामध्ये किंवा प्रसंगाच्या चित्रीकरणामध्ये व सादरीकरणामध्ये कोणताही सनसनाटीपणा येणार नाही, याची काळजी त्याने अगदी नेमाने घेतलेली आहे आणि तरीही दिग्दर्शकीय सराईतपणा नसल्यामुळे काही प्रसंगांमध्ये न्यून राहिल्यासारखे वाटते. पटकथेतील काही त्रुटी आणि दिग्दर्शक म्हणून राहिलेले न्यून यांबाबत काही केले गेले असते, तर चित्रपटाने आणखी वेगळीच उंची गाठली असती, यांत संशय नाही. नारायणन यांच्या इस्रोमधील कारकिर्दीचा भाग स्वैर बदल न करता चित्रपटात वस्तुस्थितीला धरून दाखवलेला आहे. अपवाद एका प्रसंगाचा - बालकृष्णन या नारायणन यांच्या सहकार्याला एका खास कामगिरीसाठी भारतातून फ्रान्समध्ये बोलावलेले असते. या दरम्यान त्याच्या लहान मुलाचा मृत्यू होतो. नारायणन यांचा कर्तव्य-कठोरपणा दाखवण्यासाठी चित्रपटात हा करुण प्रसंग नाट्यमय केला गेला आहे. प्रत्यक्षात मात्र ही दुर्दैवी बातमी कळूनदेखील बालकृष्णनच्या कामात बाधा येऊ नये, म्हणून ती त्याच्यापासून लपवून ठेवत तो भारतात गेल्यावर घरी पोहोचण्यापूर्वी म्हणजे तेवढी उशिरा त्याला सांगितली गेली. साहजिकच बालकृष्णन नारायणन यांच्यावर अतिशय चिडला; मात्र त्याला लगेचच त्यांची बाजूही कळली आणि पुढे त्या दोघांची भारतात भेट झाल्यानंतर झाल्या प्रसंगाचा उल्लेखही न करता त्यांनी उत्तम पद्धतीने एकत्र काम केले.

जेव्हा लोक तुमच्या मागे बोलतात, तेव्हा समजून घ्यावं की.....तुम्ही त्यांच्या दोन पाऊले पुढे आहात.

चित्रपटात अनेक तांत्रिक उल्लेख आहेत. थोडीफार उत्सुकता असेल, तर त्या बाबी समजू शकतात. मुळात तिरुवनंतपुरमला भेट देणाऱ्या किती पर्यटकांना माहीत असते की, शहरापासून काही कि.मी. अंतरावर इस्रोचे अतिशय सुंदर असे संग्रहालय आहे! तेथे अगदी प्रथमपासून भारताने सोडलेल्या रॉकेट्ससह अनेक उपग्रहांच्या प्रमाणबद्ध प्रतिकृती ठेवलेल्या आहेत आणि इच्छुकांना हे सारे व्यवस्थित समजावून सांगण्याची अतिशय उत्तम सोय तेथे आहे. प्रत्येक पर्यटकाने आपल्या भेटीमध्ये या संग्रहालयाचा समावेश ठरवून करायला हवा. तर सांगायचे म्हणजे भारतीय शास्त्रज्ञ बरीच वर्षे घन इंधनावरील संशोधनातच अडकून पडले होते आणि नारायणन यांनी मात्र थेट द्रव इंधनावरील संशोधनाचा हट्ट धरला तो कशासाठी, पुढे नारायणन क्रायोजेनिक इंधनावरील तंत्रज्ञानाशी संबंधित विभागाचे प्रमुख का झाले, या घन, द्रव व क्रायोजेनिक इंधनांचे घटक कोणते असतात, हे समजणे थोडेसे तांत्रिक होईल, परंतु ते अजिबात क्लिष्ट नाही. चित्रपटात या तपशिलांना फाटा देण्यात आला आहे व केवळ घन व द्रव इंधन असे मोघम उल्लेख आहेत.

यापूर्वी केलेल्या उल्लेखाप्रमाणे, नारायणन यांच्यावरील अन्यायापुरते कथानक असलेल्या मूळ प्रस्तावित चित्रपटाचे नावच मुळात 'विचहंट' असे होते. त्यात नारायणन यांना कोणी व कोणत्या कारणाने लक्ष्य केले याचे तपशील येणे क्रमप्राप्त होते. 'रॉकेट्री' या चित्रपटामध्ये मात्र या भागाला जवळजवळ पूर्णपणे फाटा का देण्यात आला आहे, हे कळू शकत नाही. वास्तविक नारायणन यांना अटक झाली, ती १९९४ मध्ये. त्यांच्याविरुद्ध दिलेले पुरावे इतके फुसके होते की, हे प्रकरण बनावट असल्याचे एकाच महिन्याच्या तपासामध्ये सीबीआयच्या लक्षात आले आणि मे १९९६मध्ये सीबीआयने कनिष्ठ न्यायालयाला तसे सांगितलेदेखील. न्यायालयाने सीबीआयचे म्हणणे ग्राह्य धरून सर्वांना निर्दोष जाहीर केले. मात्र १९९६मध्ये केरळमध्ये सत्ताबदल होऊन कम्युनिस्ट सरकार आले आणि या प्रकरणाचा नव्याने तपास करण्याचे आदेश देण्यात आले. १९९८मध्ये सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाचा नव्याने तपास करण्यास नकार दिला, तेव्हापासून केरळ सरकारने आपल्या भ्रष्ट पोलीस अधिकाऱ्यांना संरक्षण दिले. केरळ पोलिसांमधील संघर्ष, सीबीआय आणि इंटेलिजन्स ब्युरो (आयबी) यांच्यातील संघर्ष आणि आयबीमधील भ्रष्ट अधिकाऱ्यांची भ्रष्ट केरळ पोलिसांना साथ या साऱ्यातून हे प्रकरण चिघळले. त्यांना या प्रकरणात खोटेच गुंतवणाऱ्या केरळच्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, यासाठी नारायणन २०१७ मध्ये न्यायालयात गेले. गुजरातमधील २००२ च्या दंगलीच्या वेळी तेथे वरिष्ठ पोलीस अधिकारी असलेल्या आर.बी. श्रीकुमार यांना गुजरातचे तेव्हाचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांच्याविरुद्ध खोटी प्रकरणे बनवण्याच्या आरोपावरून नुकतीच अटक करण्यात आली. हेच श्रीकुमार आयबीचे उपप्रमुख असताना त्यांनी नारायणन यांच्याविरुद्ध कुभांड रचले होते, असा आरोप आहे. श्रीकुमार यांनी शिफारस केलेल्या व्यक्तीला इस्रोमध्ये नोकरी देण्यास नारायणन यांनी नकार दिल्यामुळे त्यांनी नारायणन यांच्यावर डूख धरले व त्यातून हे सारे घडल्याचे सांगण्यात येते. मात्र नारायणन यांच्याकडे इस्रोमध्ये असलेली विशेष महत्त्वाची जबाबदारी पाहता इस्रोच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या काळात याबाबत स्वीकारलेले मौनदेखील इस्रोमध्ये सारे काही आलबेल नाही हे दर्शवते. त्यामुळे एकट्या श्रीकुमार यांनी डूख धरण्यातून हे सारे घडले असेल, यावर विश्वास ठेवणे कठीण आहे. कारण अटकेदरम्यान नारायणन यांचा जो छळ केला गेला, त्यात इस्रोच्या क्रायोजेनिक म्हणजे नारायणन यांच्याच विभागाच्या आणखी वरिष्ठ अधिकाऱ्यांना गुंतवण्यासाठीही त्यांच्यावर दबाव टाकण्यात आला होता. मात्र नारायणन या दबावाला

बधले नाहीत. सीबीआयने लगेचच दोषमुक्त केल्यानंतरही नारायणन यांना पुन्हा सेवेत घेण्याची संधी न मिळू देण्याचे षड्यंत्र या साऱ्यामागे असल्याचे स्पष्टपणे दिसते. त्या काळात केंद्र सरकारमध्ये असलेल्या अस्थैर्यामुळे भारताच्या अवकाश संशोधन प्रकल्पांकडे केवढे अक्षम्य दुर्लक्ष झाले असेल, याची कल्पना येते. नारायणन यांना अशा कारस्थानाद्वारे इस्रोमधून बाहेर काढण्याच्या भयंकर प्रकारात कोणाही उच्चपदस्थाने कसा हस्तक्षेप केला नाही, याचे राहून राहून आश्चर्य वाटते. १९९४ ते २००३ अशी तब्बल नऊ वर्षे इस्रोचे प्रमुख असलेले प्रसिद्ध शास्त्रज्ञ के. कस्तूरीरंगन यांनी सीबीआयने नारायणन यांच्याविरुद्धच्या प्रकरणात काही तथ्य नसल्याचे जाहीर केल्यानंतरही हस्तक्षेप करण्यास नकार दिला होता. इस्रोच्या शास्त्रज्ञांवरील हेरगिरीच्या आरोपाखालील कारवाई ही केरळ पोलिसांच्या नव्हे, तर केंद्रिय यंत्रणांच्या अखत्यारीतील बाब असूनही इस्रोने पोलीस हस्तक्षेपास विरोध केला नाही. 'देशहित सर्वोपरी' या भावनेने काम करणाऱ्या इस्रोच्या एका ज्येष्ठ संशोधकाला पोलीस तपासादरम्यान मरण्याची वेळ येईपर्यंत बेदम मारहाण होऊ शकते, हा संदेशच इस्रोसाठी काम करू इच्छिणाऱ्या संशोधक वृत्तीच्या कित्येक हुशार व्यक्तींचेच नव्हे, तर इस्रोमधीलच संशोधकांचेही मानसिक खच्चीकरण करणारा ठरू शकतो, याची इस्रोच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांना फिकीर असल्याचे दिसले नाही. हा भाग चित्रपटामध्ये फारच त्रोटकपणे सादर केला गेला आहे. त्यामुळे नारायणन यांच्यावर असा भयानक स्वरूपाचा अन्याय करणारे प्रत्यक्षात कोण होते, हे गुलदस्त्यातच राहते.

मागे उल्लेख केलेला घटनाक्रम पुरेसा नाही म्हणून की काय, मुळात नारायणन यांना या प्रकरणात कसे गोवले गेले, याची राजकीय साखळी पाहिली, तर मती अक्षरश: गुंग होते. या साऱ्याच्या मुळाशी होती ती के. करुणाकरन आणि ए.के. अँटनी या केरळ काँग्रेसच्या दोन नेत्यांमधील सत्तास्पर्धा. विजयन नावाच्या पोलीस इन्स्पेक्टरने मरियम रशिदा या मालदिवी महिलेकडे लैंगिक संबंधांची मागणी केली. तिने नकार दिल्यावर विजयन याने चिडून तिला अटक केली व तिच्यावर हेरगिरीचा आरोप लादला. मुख्यमंत्री करुणाकरन यांच्या विश्वासातील पोलीस प्रमुख रमण श्रीवास्तव यांना अडचणीत आणण्यासाठी अँटनी यांच्याशी जवळीक असलेल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी ही संधी साधली. रशिदावर हेरगिरीचा आरोप लादायचा, तर त्याचा इस्रोशी संबंध लावायला हवा; याकरता आधी नारायणन यांचे कनिष्ठ सहकारी डी. शशिकुमारन, रशियाच्या अवकाश संस्थेचे प्रतिनिधी के. चंद्रशेखर, मजूर पुरवणारा एक कंत्राटदार आणि रशिदाची मैत्रीण अशा चौघांना अटक करण्यात आली. त्यांच्याकडून थातूरमातूर कागदपत्रे 'जप्त' करण्यात आली. त्यानंतर दोन आठवड्यांनी नारायणन यांनाही अटक झाली. रशिदाने या दोघांना हनीट्रॅपमध्ये अडकवल्यानंतर तिने त्यांच्याकडून इस्रोची अतिसंवेदनशील कागदपत्रे पाकिस्तानकडे पोहोचवण्यासाठी मिळवली, असा आरोप ठेवण्यात आला. सुमारे पन्नास दिवसांच्या या अटकेच्या काळामध्ये त्यांचा अनन्वित छळ करण्यात आला. एक वेळ तर अशी आली की, नारायणन यांचा जीव जाईल असे वाटल्यावर त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले गेले.

नारायणन यांना या प्रकरणात गोवण्यातील सहभागाचा आरोप असलेले केरळचे माजी पोलीस महासंचालक टी. पी. सेनकुमार हे २०१९ मध्ये भाजपाकडून केरळमधून लोकसभेची उमेदवारी मिळवण्यास इच्छुक होते. नारायणन यांना 'पद्मभूषण' हा सन्मान जाहीर झाल्यानंतर सेनकुमार यांनी त्या निर्णयावर टीका केली होती. मात्र केरळमधील एका प्रचारसभेमध्ये पंतप्रधान मोदी यांनी नारायणन यांचा 'देशभक्त व थोर संशोधक' अशा नि:संदिग्ध शब्दांमध्ये

जाहीर उल्लेख केल्यानंतर त्यांच्या या प्रयत्नावर पाणी पडले.

नारायणन विक्रम साराभाईंच्या मार्गदर्शनाखाली काम करत होते, त्या काळात - म्हणजे सत्तरीच्या दशकामध्ये इस्रोच्या प्रकल्पांना पुरेसे अर्थसाहाय्य न मिळणे ही अतिशय सामान्य बाब होती. खिसा फाटका असताना मोठमोठी स्वप्ने पाहण्याचा तो प्रकार होता. त्यामुळे येणाऱ्या मर्यादांमध्येच इस्रोच्या शास्त्रज्ञांना काम करावे लागायचे. शिवाय आर्थिक पाठबळ मिळाले, तरी त्यातून हाती घेता येऊ शकणाऱ्या प्रकल्पाचा आवाका जागतिक स्तराशी मेळ खाणारा नसल्यामुळे त्याला अनेकदा व्यावसायिक व्यवहार्यता नसे व त्यामुळे शास्त्रज्ञांमध्ये नैराश्य येणेही साहजिक असे. पदव्युत्तर संशोधन विक्रमी वेळात संपवल्यावर नासामध्ये मिळालेल्या घसघशीत पगाराच्या नोकरीकडे पाठ फिरवून भारतातच संशोधन करायचे, या हेतूने भारतात परतलेल्या नारायणन यांचा हिकमती स्वभाव चित्रपटाच्या कथानकातून अतिशय प्रभावीपणे दिसतो. हा हिकमती स्वभाव कोणता? तर 'अशक्य' हा शब्दच नारायणन यांच्या शब्दकोशात नव्हता. त्यांनी विक्रम साराभाई यांनाही याची झलक दाखवली होती. पुढे भावी संशोधनासाठीची स्वत:ची गरज म्हणून त्यांनी पदव्युत्तर शिक्षण घेण्याचे ठरवले आणि तेदेखील अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठातील जगप्रसिद्ध संशोधक प्रा. लुइजी क्रॉको यांच्याकडे. वास्तविक आपल्या कौटुंबिक कारणांमुळे हे प्राध्यापक त्या काळात कोणा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत नव्हते. तरीही नारायणन यांनी स्वत:च त्यावरचा उपाय शोधून काढला आणि आपली इच्छा पूर्ण करून घेतली. ब्रिटन त्यांच्याकडील तब्बल चाळीस कोटी पौंडांचा संशोधनाचा प्रकल्प मोडीत काढणार असल्याचे कळल्यावर तो भारताला मोफत द्यावा असे रोल्स रॉयस कंपनीच्या अध्यक्षांना सांगण्याचे धाडस नारायणन यांनी केले आणि तो प्रत्यक्षात भारतात हलवण्यात यशही मिळवले. मात्र हे सढळ हस्ते मिळालेले दान घेण्यासाठी इस्रोचीच झोळी कशी फाटकी होती आणि पुढे इस्रोतील विविध शास्त्रज्ञांनी त्याचे एकूणच कसे मातेरे केले, त्याची कहाणी नारायणन यांनी आपल्या पुस्तकात सांगितली आहे. पुढे आपल्या भारतीय सहकाऱ्यांना संशोधनाच्या उत्कृष्ट सोयींचा अनुभव मिळावा, याकरता त्यांनी तब्बल पन्नास तरुण भारतीयांना फ्रान्सला नेण्याची किमया केली. ते एक उत्कृष्ट 'डुअर' म्हणजे घडवणारे होते. ते आपल्यासमोरील अनंत अडचणींचे पाढे वरिष्ठांकडे वाचणाऱ्यांपैकी नव्हते, तर त्या अडचणींवर स्वत: उपाय शोधून मगच त्यांच्याकडे जाणारे होते. असे नंबी नारायणन क्रायोजेनिक इंधनावरील इंजिनावर आधारित संशोधनाकडे वळणार, म्हणजे त्यात यशस्वी ठरणार हे निश्चित होते आणि त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर कोणाकोणाचे हितसंबंध दुखावले गेले असते हे सांगण्याची गरज नाही. आणि त्यामुळे अशा हिणकस पद्धतीने त्यांचा काटा काढण्यात आला. त्यांना या प्रकरणात गोवल्यानंतर पुढची किमान दोन दशके तरी भारत क्रायोजेनिक इंधन क्षेत्रामध्ये फारशी कामगिरी दाखवू शकला नाही, यावरून हे नुकसान केवढे मोठे होते याचा अंदाज बांधता येईल. प्रेक्षक म्हणून आणखी एक गोष्ट आपल्या लक्षात यायला हवी आणि ती म्हणजे नारायणन यांना या कटात अडकवले गेले, तो काळ देशातील राजकीय अस्थिरतेचा होता. देशाचे शत्रू अशा अस्थिरतेचा कोणत्या मार्गाने फायदा घेतील याची शाश्वती नसते. स्वत: नारायणन यांनी यासाठी अमेरिकेला जबाबदार ठरवले आहे. त्यामुळे एक विचार मनात येतो, नारायणन इस्रोऐवजी नासामध्ये मिळालेली नोकरी करत असते तर? त्यापुढील काळामध्ये तर भारतीय संरक्षण दलांच्या गरजांची नोंद घेऊनही त्याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे देशाची संरक्षणसिद्धताच धोक्यात आणली गेल्याचेही देशाने पाहिले. 'योगायोग'

असा की, मागे उल्लेख केलेले ए.के. अँटनी हेच या काळात देशाचे संरक्षण मंत्री होते. या साऱ्या कालखंडाचा समग्र आढावा घेतल्यास कोणकोणत्या आघाड्यांवर भारताचे केवढे अपरिमित नुकसान झालेले आहे, हे लक्षात येऊ शकेल.

एखाद्या अतिक्लिष्ट गोष्टीचा उल्लेख 'रॉकेट सायन्स' असा केला जातो. मात्र नारायणन यांनी द्रव इंधन वापरून बनवलेले रॉकेटसाठीचे 'विकास' इंजीन भारतीय अवकाश मोहिमांसाठी इतके विश्वासार्ह ठरले आहे की, हे शब्दश: रॉकेटचे असलेले सायन्स हा इस्रोच्या डाव्या हाताचा मळ वाटावा. नारायणन यांचे देशासाठीचे योगदान एवढे मोठे आहे. चित्रपटातील काही उणिवांचा वर उल्लेख केला असला, तरी हा चित्रपट आवर्जून का पाहावा? वर म्हटले तसे हा चित्रपट म्हणजे केवळ नारायणन यांच्यावरील अन्यायाची कहाणी सांगत नाही, तर एक तरुण, हुशार मुलगा आपल्या जिद्दीने एक मोठा संशोधक कसा झाला, गलेलठ्ठ पगाराच्या व निधीची कमतरताच पडू न देणाऱ्या नासातील नोकरीच्या पायघड्या घातलेल्या असताना ती नाकारून मायभूमीसाठी आपल्या ज्ञानाचा उपयोग करण्याची तळमळ असल्यामुळे तो भारतात परत कसा आला, रुढार्थाने संशोधनातील पी.एचडी.ची पदवी मिळवलेली नसली, तरी आज भारतीय अवकाश क्षेत्राला आजचे वैभव मिळवून देण्यात भागीदार कसा झाला, आपल्या सहकाऱ्यांच्या हिताचा व पर्यायाने देशहिताचा विचार त्याने नेहमीच कसा केला, आयुष्यातून उठवणारे संकट येऊनही त्याने न डगमगता त्याचा सामना कसा केला, हे सारे सांगणारी ही यशोगाथा आहे. 'Patriotism is the last refuge of a scoundrel' हे वाक्य असंबद्धपणे फेकणारे आपल्या आवतीभोवती अनेक जण दिसतात. त्यांनी या चित्रपटातील खरा पॅट्रियट पाहिला, तर ते तसा थिल्लरपणा थांबवतील. याकरता ही यशोगाथा पाहायलाच हवी. नंबी नारायणन यांच्यावर झालेल्या अन्यायाचे चटके केवळ त्यांनाच नव्हे, तर त्यांच्या कुटुंबाला आणि साऱ्या देशाला सहन करावे लागले आहेत. त्यांच्यावरील व त्यांच्या कुटुंबावरील अन्यायाचे परिमार्जन करण्यासाठी आपण वेगळे काही करू शकत नाही. देशासाठी अतीव महत्त्वाच्या असलेल्या या क्षेत्रातील या महर्षीवर झालेल्या अन्यायाची अंशत: का होईना परतफेड करण्याचा एक अतिशय प्रामाणिक प्रयत्न आर. माधवन याने केला आहे. त्यातील नफ्यातोट्याचा विचार न करता त्याने ही गाथा आपल्यासमोर आणली आहे. त्याच्या या प्रयत्नांबद्दल कृतज्ञता दर्शवण्यासाठीदेखील हा चित्रपट पाहायला हवा. या चित्रपटाबद्दल तुमच्या आप्तमित्रमंडळींना आवर्जून सांगा. वास्तविक 'द कश्मीर फाइल्स' हा चित्रपट पाहण्याचे आवाहन करण्यासाठी अनेक लोक जसे स्वयंस्फूर्तीने पुढे आले होते, तसेच या चित्रपटाबाबतही घडायला हवे. न जाणो, आयुष्याच्या कोणत्याही टप्प्यावर असलेल्या एखाद्या व्यक्तीला यातून स्फूर्ती मिळेल आणि ती देशहिताचा विचार करण्यास आणि त्या दिशेने पावले टाकण्यास प्रवृत्त होईल!

**– राजेश कुलकर्णी**
पुणे

•••

दिशा
नियमित
वाचा
आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत

क्रोध माणसाला पशू बनवतो.

# सत्तावीसशे वर्षांपूर्वी नागपूरनजीक होती समृद्ध औद्योगिक वसाहत...?

*महापाषाण युगात विदर्भातील एका मानव समूहाचे धातुविषयक ज्ञान अचंबित करणारे होते. नागपूर नजीक झालेल्या उत्खननात ते सिद्धही झालेले आहे. त्या विषयीचा हा थोडक्यात घेतलेला गोषवारा - संपादक*



प्रस्तुत चित्रात दाखविलेली भट्टी नागपूर जिल्ह्यातील पेंच नदीकाठी असलेल्या नयाकुंड (तह - पारशिवनी) गावालगत झालेल्या उत्खननात सापडली असून 'महापाषाण काळात' ती अशुध्द लोखंडापासून शुद्ध लोखंड उत्पादित करण्यासाठी उपयोगात आणली गेलेली आहे. सध्या ती पुण्याच्या डेक्कन कॉलेजच्या संग्रहालयात ठेवलेली आहे.

या भट्टीचे वैशिष्ट्य असे आहे की, कार्बन - १४ आयसोटोपच्या कालगणना पद्धतीनुसार तिचे वयोमान २५०० ते २७०० वर्षे इतके जुने आहे. ही भट्टी मातीपासून बनविलेली आहे. ती गोलाकार असून दोन फूट व्यासाची आहे आणि वर निमुळती होत गेलेली आहे. तिला भात्याने वारा घालण्यासाठी मातीच्या नळ्यासुध्दा जोडलेल्या आहेत. ही भट्टी इथल्याच लोकांनी तयार केलेली असून अशा प्रकारची ती भारतातील एकमेव भट्टी असल्याचे सिद्ध झाले आहे.

त्या काळी दहा ते बारा किलो अशुद्ध लोखंडापासून तीन किलो शुद्ध लोखंड तयार करण्यात येत होते. हे लोखंड ९९ टक्के शुद्ध व उच्च दर्जाचे होते. कार्बन आणि मँगनीजच्या मिश्रणात नंतर ते पोलादाइतके टणक लोखंडात रूपांतरित केले जायचे. लोखंडच नव्हे तर सोने, चांदी, तांबे यासोबतच सोने व चांदीच्या संयोगातून नव्या धातूच्या शोधाचेही काम त्या वेळी झालेले आहे.

याचा अर्थ रामायण, महाभारत, पुराणे आणि श्रुती ग्रंथांत सोने (हिरण्य, सुवर्ण), लोह (स्याम), कथिल (त्रपू), चांदी (रजत), टिन, तांबे (ताम्र), कासे वगैरेंचा जो उल्लेख येतो, तो काल्पनिक नाही.

वाग्भटांच्या 'रस-रत्न-समुच्चय'च्या अध्याय ७ मध्ये रसशाळा म्हणजे प्रयोगशाळांचे दोलयंत्र, स्वेदिनीयंत्र, पाटनयंत्र, अध-स्पंदन यंत्र, ढेकीयंत्र, बालूक यंत्र, तिर्यकपाटन यंत्र, विद्याधर यंत्र, धूप यंत्र, डमरू यंत्र अशा बत्तीसहून अधिक यंत्रांचा जो सविस्तर उल्लेख येतो, त्यापैकी एक म्हणजे (बहुधा दोल यंत्र) नयाकुंडला सापडलेली ही भट्टी.



जिंकायची मजा तेव्हाच असते, जेव्हा अनेक जण तुमच्या पराभवाची वाट पाहत असतात.

उत्खननात पेंच नदीकाठी नयाकुंड गावाजवळ लोखंडाचे कारखाने, लोखंड वितळवण्याची भट्टी, कोळसा, शुद्ध व अशुद्ध लोखंडाचे पुरावे सापडले आहेत. याशिवाय लोखंडापासून पत्रे, तारा तयार करण्याचे कामही त्या वेळेस झालेले आहे. लोखंडासोबतच सोने, चांदी, तांबे यांच्या संयुगातून तयार झालेल्या 'इलेक्ट्रम' धातूचे ज्ञानही त्या काळी होते. धातू वितळवण्यासाठी लागणारा कालावधी, त्याची पद्धत याचीही शास्त्रीय माहिती होती. मिश्र धातूंची निर्मिती, भूखनिजांपासून धातू वेगळे करण्याचे कामही त्या काळी होत असे. या धातूपासून दागदागिने निर्मिती होत असे. उत्खननात विविध धातूंपासून तयार करण्यात आलेले दागिने, ताम्रपट, सजावटीच्या वस्तू, विविध आकाराची धातूंची भांडी, मिश्र धातूंचे झुंबरे सापडल्याने या दाव्यांना भक्कम आधार आहे.

या परिसरात सद्य:स्थितीत मिळणारे कच्चे लोखंड उत्खननात सापडलेल्या लोखंडाशी मिळतेजुळते आहे. पेंच नदीमुळे पाणी आणि वाळू आपसूकच उपलब्ध आहे.

नयाकुंडच्या भोवतालच्या पाच कि. मी. परिघातील परिसर विविध प्रकारच्या खनिजांनी व्याप्त आहे. भूगर्भात दक्षिण-पश्चिमेस कोळसा, उत्तर-पूर्वेस मँगनीज आणि डोलोमाईट (मॅग्नेशियम कार्बोनेट व कॅल्शिअम कार्बोनेट यांचे संयुक्त खनिज) असा कच्चा माल मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे.

थोडक्यात, नयाकुंडचा परिसर हा धातू व त्याच्याशी निगडित असंख्य कारखाने, त्यांचे जाणकार, कुशल कामगार उदा. कर्मरा (कच्चे धातू गाळणारे), धमत्र (भट्टी चेतवणारे), हिरण्यक (सोने गाळणारे), खणक (खाणी खोदून खनिज काढणारे) आणि त्याचा व्यवसाय करणारे असा नानाविध कारणांनी गजबजलेला 'इंडस्ट्रियल झोन' होता. म्हणजे नागपूर जिल्ह्यामध्ये सत्तावीसशे वर्षांपूर्वी पेंच नदीकिनारी समृध्द MIDC कार्यरत होती.

काही असो, विज्ञानाची प्रगती झालेली नसताना महापाषाण युगातील नागपूरकरांचे धातुविषयक ज्ञान अचंबित करणारे आहे.

कधी कधी वाटते, यजुर्वेदातील एका मंत्रात 'अश्मा च मे मृत्तिका च मे गिरयश्च मे पर्वताश्च मे सिकताश्च मे वनस्पतयश्च मे हिरण्यं च मेऽयश्च मे श्यामं च मे लोहं च मे सीसं च मे त्रपु श्च मे यज्ञेन कल्पन्ताम्।'

(माझे दगड, माती, डोंगर, पर्वत, वाळू, वनस्पती, सोने, तांबे, कथिल आणि लोह हे यज्ञामुळे वाढोत) असा आलेला उल्लेख हा विदर्भवासियांना डोळ्यांसमोर ठेवून तर रचलेला नाही......?

**– दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी,
उज्ज्वल नगर, नागपूर – ४४००२५
मो.९७६६०२३४१५, ७७५८०२५३३४
ई मेल – wandalkardilip@gmail.com

•••

***दिशा संपर्क दूरध्वनी***
**०२२-२५४२ ६२७०**

# अनुवाद एक व्यवसाय-पर्याय

*'अनुवाद प्रशिक्षणा'च्या विविध आयामांच्या रूपरेषेची चर्चा करणारे व्याख्यान विद्या प्रसारक मंडळातर्फे आयोजित करण्यात आले. त्या व्याख्यानाचा संक्षिप्त अहवाल- संपादक*

नित्यनियमाने दररोज प्रत्येकासच अनुवादांची गरज भासत असणाऱ्या वर्तमान युगात, देशभरात अनुवाद प्रशिक्षणाकरता शाळा-महाविद्यालये नसावीत ही चकित करून टाकणारी वस्तुस्थिती आहे. ही त्रुटी त्वरित दूर करून जनसामान्यांना अनुवाद प्रशिक्षणाची सोय लवकरात लवकर उपलब्ध व्हावी अशी इच्छा ठाण्यातील विद्याप्रसारक मंडळाचे विद्यमान अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी व्यक्त केली. विद्याप्रसारक मंडळाच्या, बांदोडकर (स्वायत्त- ऑटोनॉमस) महाविद्यालयात पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांकरता, श्रेयगुण अभ्यासक्रम (क्रेडिट कोर्स) या स्वरूपात अनुवाद प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या विचारात, विद्याप्रसारक मंडळ आहे. त्या दृष्टीने श्रेयगुण अभ्यासक्रम निर्माण करण्याच्या दिशेने पहिले पाऊल म्हणून 'अनुवाद प्रशिक्षणा'च्या विविध आयामांच्या रूपरेषेची चर्चा करणारे एक व्याख्यान शुक्रवार दिनांक ०८-०७-२०२२ रोजी, ज्ञान-द्वीपातील पाणिनी सभागृहात आयोजित करण्यात आलेले होते. त्या व्याख्यानाचा हा संक्षिप्त आहवाल आहे.

'प्रामाणिकही आणि सुंदरही' या पुस्तकाच्या लेखिका करुणा गोखले म्हणतात.

- अनुवाद म्हणजे भरतकाम केलेल्या कापडाची उलटी बाजू
- अनुवाद म्हणजे दुधाची तहान ताकावर भागवणे
- अनुवाद म्हणजे मूळ लेखनकृती वाचता येत नाही, याबद्दल मिळालेला दिलासा
- अनुवाद हा तरुण स्त्रीसारखा असतो, सुंदर असेल; तर प्रामाणिक नसतो आणि प्रामाणिक असेल; तर सुंदर नसतो.

म्हणून तर त्यांनी आपल्या पुस्तकाचे शीर्षक 'प्रामाणिकही, सुंदरही' असे ठेवलेले आहे आणि हेच आहे 'अनुवाद कसा असावा?' या प्रश्नाचे खरे उत्तर. मात्र तो तसा कशा प्रकारे करता येईल, होतकरू




आपलाही कोणाला कंटाळा येऊ शकतो ही जाणीव फार भयप्रद आहे.

अनुवादकास त्याकरता कसे तयार करता येईल, कसे प्रशिक्षित करता येईल, हे सांगणारे हे व्याख्यान होते.

बांदोडकर महाविद्यालयातील विद्यार्थी आणि प्राध्यापक असे सुमारे शंभर प्रेक्षक या कार्यक्रमास उपस्थित होते. तसेच माध्यमविद्या शाखेतील विद्यार्थीही या कार्यक्रमास उपस्थित होते. प्रेक्षकांचा प्रतिसाद उत्स्फूर्त आणि आश्वासक होता. अनुवाद आपल्या जीवनाचा कसा अविभाज्य भाग झालेला आहे आणि त्याकरता औपचारिक प्रशिक्षणाची कशी आवश्यकता आहे याची चर्चा या निमित्ताने या व्याख्यानात केली गेली.

व्याख्यानाचा सारांश आराखडा पुढील तपशिलाने व्यक्त होऊ शकेल.

**अनुक्रम**

१. रूपरेषा

२. अनुवादाची स्रोतभाषा

३. अनुवादाची लक्ष्यभाषा

४. अनुवादक

५. अनुवाद प्रशिक्षणाच्या कोणत्या सोयी उपलब्ध असाव्यात?

६. अनुवाद करावयाच्या साहित्याचे वर्गीकरण

७. अनुवाद प्रक्रिया

८. अनुवादाच्या गरजेची उदाहरणे

९. संदर्भवाचन

अनुवाद अनुक्रमातील सर्व मुद्द्यांचा तपशिलाने विचार होण्याची आवश्यकताही व्याख्यानात व्यक्त करण्यात आली.

**रूपरेषा**

१. प्रत्यक्षातील अनुवादांच्या उदाहरणांनी अनुवाद-विषयक गरजा स्पष्ट करणे.

१. अनुवादकार आणि त्याने केलेली अनुवाद-उद्दिष्टांची तसेच अनुवादाची स्रोतभाषा आणि लक्ष्यभाषा यांची केलेली निवड.

२. अनुवाद करण्यास लागणारी साधने. संगणक, शब्दकोश, अनुवादाची मूलतत्त्वे सांगणारे ग्रंथ. पर्यायी शब्दांचे शब्दसंग्रह आणि सामान्य वापरातील शब्दांचे सहजसोपे पर्याय यांचेबाबतची चर्चा.

३. अनुवादकास आवश्यक असलेली अनुवादातील स्रोतभाषेच्या ज्ञानाची, त्यातील आकलनाची आवश्यक पात्रता.

४. अनुवादकास आवश्यक असलेली अनुवादातील लक्ष्य भाषेच्या ज्ञानाची, त्यातील अभिव्यक्तीची आवश्यक पात्रता.

५. लक्ष्य साहित्याचे वर्गीकरण आणि आनुषंगिक तपशील.

६. अनुवाद करायच्या नमुन्यांचे अनुवाद करण्याचे प्रात्यक्षिक.

७. अनुवाद प्रक्रिया.

**अनुवादाची स्रोतभाषा**

मुळात अनुवाद का हवा असतो? तर एखाद्या भाषेतला मूळ मजकूर कुणातरी भिन्न भाषिकाला, कशासाठीतरी हवा असतो. त्यामुळे हे उघडच असते की, गरजवंतास स्रोतभाषेचे ज्ञान तर असते, मात्र अर्थ समजून घेण्यास पुरेसे असत नाही. त्यामुळे स्वभाषेत तो अर्थ समजावून सांगणारा असा कुणीतरी हवा असतो किंवा त्याने सांगितलेला स्वभाषेतील अर्थ म्हणजेच 'अनुवाद' उपलब्ध असावा लागतो. अनुवादकाला स्रोतभाषेचे सम्यक ज्ञान नसले तरीही चालते. त्याला हव्या त्या मजकुराचा संपूर्ण अर्थ कळला म्हणजे झाले. अनुवाद तर त्याला लक्ष्यभाषेतच करायचा असतो, जी

बहुधा त्याची मातृभाषाच असते. किंबहुना अनुवादकाची 'लक्ष्यभाषा' त्याची मातृभाषाच असणे खूप सोयीचे ठरत असते, कारण अनुवादकाची लक्ष्यभाषेतील अभिव्यक्ती सशक्त असावीच लागते.

**अनुवादाची लक्ष्यभाषा**

अनुवादकाची 'लक्ष्यभाषा' त्याची मातृभाषा असणे चांगले. मूळ भाषेतील अर्थ, विवरण, रचनासौंदर्य, भाव आणि माहितीही पूर्ण समजून घेऊन ती लक्ष्यभाषेत यथासांग अभिव्यक्त करणे म्हणजे अनुवाद. अनुवाद करणे शास्त्रही आहे आणि कलाही. जो अनुवाद गरजवंताच्या गरजा पूर्ण करू शकतो, तो शास्त्रार्थाने परिपूर्ण मानावा लागेल. मात्र ज्या अनुवादात मूळ भाषेतील रसरंजनाची माधुरी लक्ष्यभाषेत अवतरली आहे, तो अनुवाद कलेच्या दृष्टीनेही परिपूर्ण मानावा लागतो. त्या अर्थाने गरजवंतांची गरज भागवतो, तो शास्त्रयुक्त अनुवाद ठरतो आणि रसिकांना रुचतो, तोच खरा कलापूर्ण अनुवाद होय.

**अनुवादक**

अनुवादकास अनुवाद करावयाच्या मजकुराबाबतचे मूळ भाषेतील संपूर्ण आकलन होणे गरजेचे असते. त्याला स्रोतभाषेचे निदान तितपत ज्ञान असणे, ही किमान अर्हता ठरते. मात्र लक्ष्यभाषेत त्याला जर सशक्त अभिव्यक्ती नसेल, तरीही तो उपयुक्त अनुवाद करण्यास अपात्रच ठरतो. त्यामुळे मूळ भाषेतील संपूर्ण आकलन आणि लक्ष्यभाषेत सशक्त अभिव्यक्ती करू शकणाराच अनुवादक होऊ शकतो. मात्र पर्यटनासारख्या तात्पुरत्या गरजांकरता आवश्यक असलेले अनुवाद त्या क्षेत्रातले लोक मूळ भाषेतील संपूर्ण आकलन आणि लक्ष्यभाषेत सशक्त अभिव्यक्ती नसूनही लीलया पूर्ण करताना दिसून येतात. असे अनुवादक क्षेत्रज्ञ असतात. त्या त्या विशिष्ट क्षेत्रातील अनुवादच ते करू शकतात. बांधकाम, न्यायव्यवस्था, अर्थव्यवस्था ही क्षेत्रेही अशीच आहेत. त्याउलट पुस्तकांचे अनुवाद करणाऱ्यास टिकाऊ साहित्याची पुनर्निर्मिती करावयाची असते. त्याला अधिकची पात्रता, अनुभव आणि व्यासंगही आवश्यक असतो.

**अनुवाद प्रशिक्षणाच्या कोणत्या सोयी उपलब्ध असाव्यात?**

१. प्राथमिक अनुवाद प्रशिक्षण, अनुषंगिक अध्यापकवर्ग आणि शिक्षणव्यवस्था.

२. स्रोतभाषा-लक्ष्यभाषा जोडीगणिक स्वीकृत पर्यायी शब्दांचा जालसंजीवित शब्दसंग्रह.

३. स्वीकृत पर्यायी शब्दांचा शब्दसंग्रह वाढवत, पुनरीक्षण करून स्वीकारणारी व्यवस्था.

४. स्रोतभाषा-लक्ष्यभाषा जोडीगणिक, अनुवाद पुनरीक्षक, संपादक, प्रकाशक इत्यादी.

५. अनुवादशास्त्र विकासास वाहिलेले नियतकालिक, सहभागी अनुवादकांचा कायप्पा गट.

**अनुवाद करावयाच्या साहित्याचे वर्गीकरण**

१. कथा, कादंबऱ्या, कविता, चरित्रे, प्रवासवर्णने, अनुभवकथने, नाटके, चित्रपट इत्यादी भाषाविषयक साहित्य;

२. अहवाल, जमाखर्च, निवेदने, नोंदी, लेखा परीक्षणे इत्यादी हिशेबात्मक साहित्य;

३. उपकरणांची वर्णने, यंत्रांची परिचयपत्रे, संयंत्रांच्या संचालन संहिता, वस्तूची जाहिरातपत्रके इत्यादी तांत्रिक साहित्य;

४. बांधकामातील वस्तूंच्या याद्या, अवजारांच्या याद्या, नोंदणी संदर्भातील कागदपत्रे, कामगारांची उपस्थिती पत्रके, वेतन वह्या इत्यादी प्रत्यक्ष घडामोडींच्या लिखित नोंदी;

५. न्यायव्यवहार, संविधान, कायदे, नियम, दंडसंहिता, खटल्यांची इतिवृत्ते आदी साहित्य;

६. महसुली व्यवहार, शासकीय नोंदी, जमीनजुमल्याचे व्यवहार, कर आकारणी, कर वसुली, अंदाजपत्रके, पणन-विपणन व्यवहार आणि एकूणच शासनव्यवहार साहित्य;

७. पर्यटन स्थळे, त्यांची वर्णने, तिकिटे, यात्रासंस्था, सहल नियोजने, कार्यक्रमांच्या सूची, प्रवासी वेळापत्रके, पर्यटन, स्थलदर्शन इत्यादींदरम्यान आवश्यक असलेल्या व्यवहारांची पत्रके, पुस्तके, कार्यक्रमपत्रिका, नियमपुस्तिका, दरपत्रिका इत्यादी साहित्य;

८. विज्ञान, तंत्रज्ञान, त्यांतील प्रगती, संशोधन, त्याचे अहवाल, विकास, भावी वाटचालींचे नियोजन, वृत्तांकने, वैज्ञानिकांची चरित्रे, असे सर्वच विज्ञानविषयक साहित्य;

९. नैतिक वर्तन, धर्म, प्रार्थनास्थळे, धर्मसभा, मेळे, मंदिरे, स्तोत्रे, आचारसंहिता इत्यादींबाबतचे धर्मविषयक साहित्य;

१०. आरोग्य, सार्वजनिक आरोग्य, आरोग्य व्यवस्था, आयुर्वेद, औषधनिर्मिती, शुश्रुषालये, उपचार संहिता, जीवनरक्षक प्रणाली, अपघातधक्क्यातून सावरणाऱ्या प्रणाली, प्रतिबंधक तसेच आपत्कालीन उपचार व्यवस्था इत्यादींबाबतचे साहित्य.

### अनुवाद प्रक्रिया

१. गरजवंत, हौशी अनुवादक, शासनयंत्रणा, व्यापारी आस्थापना इत्यादींच्या अनुवादाबाबतच्या अपेक्षा, आवश्यकता आणि गरजा जाणून घेणे.

२. आवश्यक अनुवाद कोण करू शकतील याचा अंदाज घेऊन पात्र व्यक्तीस अनुवादाकरता प्रोत्साहित करणे.

३. पात्र व्यक्तीने स्रोत भाषेतील मजकूर नीट समजून घेऊन, आपल्या द्वैभाषिक कौशल्यांचा पुरेपूर वापर करून लक्ष्य भाषेत अनुवाद करणे.

४. तज्ज्ञ व्यक्तीने तो तपासून योग्य करणे, संपादन करणे.

५. केलेला अनुवाद गरजवंतांपर्यंत वेळेत पोहोचवणे.

६. चालू असलेल्या भाषण वा संभाषणाचा वाक्यावाक्यागणिक तत्काळ अनुवाद हवा असल्यास अनुवादकास सोबतच राहावे लागते. त्याला अनुवादाची विशेष योग्यता असणे गरजेचे असते.

७. कुशल अनुवादकास अनुवाद करताना अनुभवणे. प्रात्यक्षिक.

८. संगणक पडद्यावर डाव्या-उजव्या खिडक्यांत स्रोत आणि लक्ष्य मजकूर ठेवून, जालसंजीवित अनुवाद करण्याची गतिमान पद्धत.

### अनुवादाच्या गरजेची उदाहरणे

१. शासनसंबंधी यंत्रणांतील अर्ज निराळ्या भाषेत असल्याने गरजवंतास रकाने समजून घ्यायचे आहेत, अशा प्रकारची गरज. उदाहरणार्थ रेशनकार्डाकरताचा अर्ज, रेल्वे आरक्षणाकरताचा अर्ज, पोलिसात हरवल्या-चोरल्याची तकरार देण्याकरताचा अर्ज.

२. पर्यटनासंबंधातील साहित्याचे ग्राहकानुकूल अनुवाद करण्याची गरज.उदाहरणार्थ महाराष्ट्रात गुजरातमधील पर्यटक यावेत म्हणून महाराष्ट्र

शासनाच्या पर्यटन विभागाच्या मराठी पत्रकाचा गुजराती अनुवाद आवश्यक ठरतो.

३. मुलीला 'राष्ट्रीय आपत्ती' विषयावर निबंध लिहायचा आहे. मजकूर विकिपेडियावर इंग्रजीत उपलब्ध आहे. त्याचा मराठीत अनुवाद करण्याची गरज.

४. महाराष्ट्र शासनाने इंजिनिअरिंगचे शिक्षण मराठीतूनही उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतल्याने इंग्रजी पाठ्यपुस्तकांचा मराठीत अनुवाद करण्याची गरज.

५. कोल्हापूरचा गूळ व्यापारी ऑस्ट्रेलियात गूळ निर्यात करू चाहतो. त्याच्या गुळाची इंग्रजीत जाहिरात करण्याची गरज.

६. कारखान्यात लागणाऱ्या जपानी उपकरणाची माहिती जपानी भाषेतून मराठीत आणण्याची गरज.

**संदर्भः**


१. भाषांतर आणि भाषा, विलास सारंग, मौज प्रकाशन गृह, पहिली आवृत्ती १ फेब्रुवारी २०११, मूल्यः १५०/-, एकूण पृष्ठेः १३४.

२. प्रामाणिकही सुंदरही, करुणा गोखले, राजहंस प्रकाशन, पहिली आवृत्ती ऑगस्ट २०१९, मूल्यः २००/-, एकूण पृष्ठेः १४१.

३. अनुवाद कसा असावा - अरुंधती दीक्षित https://anuvad-ranjan.blogspot.com/2021/02/blog-post_22.html



**- नरेंद्र गोळे**

१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी, टिळकपथ

छेदगल्ली, टिळकनगर, डोंबिवली (पू.) ४२१२०१

भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५

Email : narendra.v.gole@gmail.com


●●●

(पृष्ठ क्र. १० वरून - **गुरुवर्य नरहर कुरुंदकरांचा वारसा**)

आपल्याला सवय असते. अशी परंपरांची चिकित्सा करणं आपल्यासाठी आव्हान असतं. हा गुरुवर्य कुरुंदकरांचा वारसा आहे. आपण तो पुढे न्यायचा यथाशक्ती प्रयत्न केला पाहिजे. कारण बुद्धिमत्ता आणि विकास व्यक्तिगत असतो, तेव्हा तो स्वत:पुरताच असतो. तो जेव्हा सामूहिक होतो, तेव्हा तो शहाणा होतो. माझ्यालेखी शहाणपण सामूहिक प्रगल्भतेत असतं आणि कुरुंदकर असं चिकित्सक शहाणपण यावं यासाठी आयुष्यभर झटत राहिले.

कुरुंदकरांचं समकालिनत्व शोधायचं, तर काही गोष्टी लगेच लक्षात येतात. आज सगळीकडे आंतरशाखीय अभ्यासाचा बोलबाला आहे. कुरुंदकरांनी असा अभ्यास सत्तर-ऐंशीच्या दशकात नुसता अनुसरला नाही, तर त्याला उत्तुंग पातळीवर नेऊन ठेवलं. दुसरं म्हणजे कुरुंदकर विचारांमध्ये अडकून पडत नाहीत. जुन्याची चिकित्सा आणि नव्याचा स्वीकार करताना नवंही जुनंच होत जाणार याची जाणीव सतत त्यांच्या लिखाणात असते. मला कुरुंदकरांमध्ये डॉ. सॅम्युअल जॉन्सन आणि रोला बार्थ एकत्र आलेले दिसतात. जणू या दोघांची मराठी आवृत्ती म्हणजे कुरुंदकर. जॉन्सनची व्यासंग आणि चिंतनातून आलेली अव्वल दर्जाची समीक्षा आणि रोला बार्थची सतत स्वत:ला नाकारणारी, नवं शोधणारी कल्पक चिकित्सा हे दोन्हीही कुरुंदकरांमध्ये आहेत.

चला आपण कुरुंदकरांचा वारसा चालवायचा प्रयत्न करू या!


**- डॉ. आनंद कुलकर्णी**

इंग्रजी विभाग प्रमुख

ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य

महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव

ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४


●●●

# दहा-बारा शेंगा आणि आभाळभर आनंद

*'निसर्गवेध' संस्थेतर्फे फळझाडांची रोपं भेट देण्याचा उपक्रम राबवला जातो. या उपक्रमाविषयी माहिती सदर लेखात देण्यात आली आहे - संपादक*

परसटोला हे ८८४ लोकसंख्या असलेलं गाव भंडारा जिल्ह्यातील साकोली तालुक्यात येतं. हे गाव साकोलीपासून ८ किलोमीटर अंतरावर आहे. गावाची स्वतंत्र ग्रामपंचायत आहे. श्री. हरिश्चंद्र सखाराम दोनोडे हे गावाचे तरुण सरपंच आहेत. या गावात आज आम्ही 'निसर्गवेध' संस्थेतर्फे फळझाडांची रोपं भेट दिली. रोपांची वाहतूक करण्यासाठी परसटोल्याचे एक रहिवासी श्री. तिलक महादेव दोनोडे यांनी स्वतःचा डग्गा (लहान टेम्पो) विनामूल्य उपलब्ध करून दिला. पिटेझरी गावातील निसर्गवेधच्या डॉ. वांगारी माथाई रोपवाटिकेतील फळझाडांची रोपं डग्ग्यापर्यंत आणून देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांनी मदत केली. चिराग राजकुमार उईके, जयेश ओमप्रकाश टेकाम, सूरज संजय टेकाम, ब्रह्मानंद जयदेव भलावी, वेदांत चैतराम टेकाम आणि प्रशांत संजय वाढवे या मुलांनी १७० रोपं डग्ग्यापर्यंत आणून दिली.





रोपं आणून देताना पिटेझरीतील बालमित्र

नारळ, आंबा, शेवगा, सुपारी, चिकू, ॲपल बोर, केळी (जळगावी वाण), सीताफळ, फणस, बंगला पान (नागवेल), मोसंबी, संत्रा, काजू, पेरू अशी १४ जातींची १७० रोपं गावकऱ्यांमध्ये वाटण्यात आली. निसर्गवेधतर्फे या गावात पहिल्यांदाच रोपं देण्यात आली. एकूण ८४ लोकांनी रोपांचा लाभ घेतला. प्रत्येक कुटुंबाला दोन झाडं उपलब्ध करून देण्यात आली.

दिलेली दोन झाडं जगवली, तर पुढील काही महिन्यांमध्ये प्रत्येक कुटुंबाला पुन्हा दोन फळझाडांची रोपं भेट दिली जाणार आहेत. लोक आता ही रोपं शेतांच्या धुऱ्यांवर (बांधांवर) किंवा कडेला असलेल्या मोकळ्या जागेत, घरांच्या अंगणात, परसात आणि वाडीत लावणार आहेत.

माणसाचं पदचिन्ह उमटलेल्या प्रदेशातच ही झाडं लावली जाणार आहेत. एकही झाड जंगलात किंवा नैसर्गिक अधिवासात लावलं जाणार नाही. कारण निसर्गनिवडीनुसार जर ते झाड नैसर्गिक अधिवासात आढळत नसेल, तर असं झाड लावणं म्हणजे वाघाला

केवड्याला फळ येत नाही, पण त्याच्या सुगंधाने तो अवघ्या जगाला मोहवून टाकतो.

वरणभात खायला घालण्यासारखं होईल! शिवाय, पशुपक्ष्यांच्या अत्यंत परिणामकारक अशा नैसर्गिक बीजप्रसार केंद्राच्या (!) माध्यमातून त्या झाडाची जात सर्वदूर फोफावू शकते. त्यामुळे नैसर्गिक अधिवासात बाधा येऊ शकते. जंगलाच्या परिसंस्थेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या वृक्षप्रजातींवर ही घुसखोर प्रजाती कुरघोडी करू शकते.

आज सकाळी गावात छान प्रसन्न वातावरण होतं. प्रत्येक लाभार्थीचं संपूर्ण नाव आणि त्याला हवी असलेली दोन झाडं हा गृहपाठ आधीच केलेला असल्यामुळे एकूण काम सोपं झालं. तरीही रोपं गाडीतून उतरवल्यानंतर लोकांनी एकच कल्ला केला. मंडई भरावी, तशा आरडाओरड्याला उपस्थितांनी झाडी बोलीतील शेलक्या शिव्यांचा तडका दिला. जिथे तिथे कडमडणाऱ्या डगडग्या मुलांना आवरण्याचं काम एका उत्साही काकांनी केलं. गावात फळझाडांची रोपं मोफत वाटली जात आहेत ही बातमी सावरीची शेंग फुटावी तशी गावभर पसरली. झाडांसाठी नावनोंदणी करण्यात सुस्ती करणाऱ्या किंवा नावांची यादी तयार केली जात होती, तेव्हा बाहेर गेलेल्या लोकांनी त्यांची नावं दिली. पाहता पाहता ९३ लोकांची नवीन यादी तयार झाली. आता त्यांना सुमारे १९० रोपं वाटायची आहेत. (हा लेख तयार होऊन सगळ्यांना पाठवेपर्यंत झाडांचं वाटप झालेलं होतं.)



**आमच्या रोपवाटिकेत काम करणारे सेवकभाऊ थाडेझरी गावात एका महिलेला रोपाची भेट देत आहेत.**

**आतेगाव भेट**

आतेगाव हे सुमारे ७५० वस्तीचं गाव वनखात्याच्या उमरझरी या क्षेत्रात येतं. मागच्या वर्षी, दिनांक १५ सप्टेंबर २०२० रोजी संस्थेतर्फे या गावात १०० रोपं वाटण्यात आली होती. त्यापैकी ७५ रोपं लोकांनी



**आतेगावातील एक नागरिक प्लास्टिकच्या पोत्याचा पुनर्वापर करून रोपाचं संरक्षण करताना**

जगवली. लोक आपापल्या पद्धतीनं लावलेल्या रोपाचं संरक्षण करतात. खादाडखाऊ शेऱ्यापाटऱ्यांपासून वाचवण्यासाठी कुणी त्याच्याभोवती बांबूच्या काठ्या खोचून आडोसा तयार करतं, तर कुणी काड्या लावून घरातलं जुनेरं गुंडाळतं. आतेगावातल्या एका मित्रानं तर लावलेल्या रोपावर एक फुटलेला, मोठ्या आकाराचा माठ मांडला. एकदा का एखाद्या रोपानं साधारण दोन उन्हाळे-पावसाळे पाहिले, की मग काळजीचं कारण नसतं. ते आपलं आपण वाढत राहतं. उन्हाळा सुरू झाला की, रोपांच्या काड्या होतात. त्यांच्याकडे बघून छातीत धस्स् होतं. आता ती माना टाकतात की काय असं वाटणारी रोपं पाऊस चांगला सुरू झाला की, बघत राहावी अशी तरारतात.

या जगात सर्वांत सोपी आणि निरुपयोगी गोष्ट म्हणजे विनाकारण चिंता करणे.

आश्विनात तर आपण लावलेलं रोप ते हेच का असा प्रश्न पडावा एवढा बदल होतो. रोपाची वाढ बघून सगळी काळजी मिटते. या गावात फळझाडांची रोपं देणं हा एक प्रयोगच होता. हा प्रयोग बऱ्याच अंशी यशस्वी झाला हे लक्षात आल्यावर आज, सोमवार दिनांक २७ सप्टेंबर २०२१ रोजी आम्ही एकूण ६६ लोकांना ११ जातींची १५२ रोपं भेट दिली. उमरझरी या गावात राहणारे श्री. नरेश विठ्ठल बावणे यांनी पिटेझरीहून आतेगावला अगदी अलगद रोपं नेऊन दिली. एकाही रोपाला इजा झाली नाही.

आतेगावातील उत्साही तरुण हरीश ओमदास कळपते यानं अत्यंत शिस्तबद्ध कार्यक्रम आयोजित केला होता. हरीशनं भंडारा जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या प्रशस्त आवारात मोठी सतरंजी टाकून सगळ्यांची बसण्याची व्यवस्था केली होती. हरीशनंच कार्यक्रमाचं सूत्रसंचालन केलं. त्यानं नाव पुकारलं की, लोक पुढे येऊन झाडांची रोपं घेऊन जात होते. आंबा, मोसंबी, पेवंडी बोर, केळ, चिकू, फणस, सुपारी, बंगला पान, नारळ आणि पेरू या झाडांची रोपं वाटण्यात आली. फळझाडांची रोपं हव्या असलेल्या लोकांनी नावनोंदणी केली होती. त्यामुळे कोणताही गोंधळ झाला नाही. या कार्यक्रमाला गावातल्या चिंट्यापिंट्यांनीही हजेरी लावली होती. प्रत्येक उपस्थित मुलाला खाऊ म्हणून आम्ही बिस्किटांचा एक पुडा दिला. भंडारा येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक माननीय श्री. जयवंत रामचंद्र चव्हाण यांनी हा खाऊ दिला होता.

उपस्थितांमध्ये महिलांची संख्या चांगली होती हे बघून सौ. अनघा किरण पुरंदरे यांनी पिटेझरी गावात सध्या सुरू असलेल्या कापडी पिशव्या, वाकरी (गोधड्या), चलभाष थैल्या (mobile pouch) आणि साड्यांच्या पिशव्यांच्या उपक्रमाची माहिती दिली. त्यामुळे जंगला-पहाडात राहणाऱ्या लोकांना खण्ण् वाजणाऱ्या नाण्यासारखा पर्यायी उत्पन्नाचा स्रोत कोणता असू शकतो हे कळलं. गेल्या काही वर्षांमध्ये अनेक कारणांमुळे अत्यंत बेभरवशी झालेलं असलं, तरीही लोक धानाला (तांदळाच्या पिकाला) धरून आहेत. धानाबरोबरच लहान प्रमाणात इतर काही पिकं घेतली तर फायदा होऊ शकतो. पिटेझरी आणि परिसरातील काही गावांमधील लोकांनी पिकवलेल्या पिवरा (हळदीची पूड), जवस, हिरोती (मिरचीची पूड), तीळ यांची मुंबई-पुण्यात चांगली विक्री होऊ शकते हे ऐकल्यावर आतेगावकरांचे डोळे उघडले.

जमलेल्या सर्व लोकांचा निरोप घेऊन आम्ही हरीशच्या घरी गेलो. हरीशनं खुसखुशीत चाकोल्या खायला दिल्या. मग, लिंबू पिळून घातलेली इकडची प्रसिद्ध काली चाय. आतेगाव सोडताना आमच्या गाडीचा आवाज ऐकून एक मध्यमवयीन महिला हसत हसत पुढे आली. तिचं नाव होतं उषा लहानु हटवार. उषा आम्हांला तिची वाडी दाखवायला घेऊन गेली. वाडी म्हणजे परसबाग, पण जरा मोठी. तिच्या भाषेत सांगायचं तर वाडीमध्ये चाळीस रंगांची झाडं, म्हणजे अनेक जातींची झाडं लावलेली होती. उषानं आम्हांला चार मोठाली रसाळ मोसंबी दिली. गेले काही दिवस असंच होतंय. जिकडे जाऊ तिकडे लोक हसतमुखानं आम्हांला सारखं देत आहेत, संकोच व्हावा इतकं. दोडका झुमका दोडका, कारली, सीताफळं, मोसंबी, गोडनिंबाचे टाळे.... आणि सोबत निवळशंख पाण्यासारखं प्रेम ! तेही किती सहज. फूल फुलावं तसं !!

आतेगावला आलो आणि कांता मावशीला भेटलो नाही, असं सहसा होत नाही. कांतामावशी म्हणजे कांताबाई भिवाजी ईलमकार. कांता मावशी भेटली की, जरा रानटी हसते. ती हसली की, तिचा पानाचा शौक दिसतो. आमच्याकडून नेलेलं प्रत्येक झाड तिनं जगवलं

आहे. सध्या तिची वाडी हाऊसफुल्ल आहे. ती जिद्दीनं झाडं जगवते. अशा वेळी कोणताही ढिसाळपणा तिला चालत नाही. ती बिना मुरवत शेजारीपाजारी राहणाऱ्या लोकांची आणि घरच्यांचीदेखील हजेरी घेते.

'कष्ट केलो. हे ढोरावासरा पोसलो. सगळाच करून रायलो. चांगला झाड दे जा. मले पायजे मले. जगवायचा. बोर नसे? बोर लावलंन. त्या पोरानं लावलंन? अरे मी लावलं मी. मीच लावलं. त्येचा बाप काय लावतो? हो. आपल्याकडे लावीन ना मी. सगडा काई जगवलो बाई. सब भोंगसूळ आहेत. येक झाड नाय लावलंन. झाड फरला म्हंजे खावाच्या कामाचे आहेत सगळे. तो केडीचा घड पायलात? केडी जमल्या आयेत तेती. हे एवढे मोटे केडी लावलो मी. केडीचे घड आयेत तेती मोटे मोटे. दोन वस्तू द्या माया मनपसंतीच्या. बोरीचा झाड आन बंगला पान द्या. जगवीन ना. जगवीन मी त्याले!'

कांता मावशीनं आम्हांला तिची सगळी वाडी फिरून दाखवली. तिच्या सूनबाईनं वाडीतल्या एका कोपऱ्यात भाजीपाला लावला होता. पण तो रसरशीत दिसत नव्हता. त्याबद्दल पदर सावरत मोठ्या ठसक्यात ती मला म्हणाली, ''हे बगा, आमच्या सूनबाईचं सोंग!''

कांता मावशी भेटली की वाटतं आता झाडांना चांगले दिवस आले आहेत.

'टेक महिंद्रा' या जगप्रसिद्ध कंपनीच्या आणि आपल्या देशातील शेकडो निसर्गप्रेमी नागरिकांच्या आर्थिक सहयोगामुळे प्रत्यक्षात उतरलेल्या या उपक्रमाचं हे दुसरं वर्ष आहे. सुरुवातीला आम्हांला लोकांच्या डोक्यात झाडं लावावी लागली ! आता लोक कुठून कुठून फोन करून स्वतःहून झाडांची मागणी करत आहेत. लोकांना भरपूर झाडं हवी आहेत. ते अत्यंत आनंदानं, प्रेमानं झाडं लावत आहेत. अंगात बारा हत्तींचं बळ यावं अशी ही परिस्थिती आहे. विशेषतः आम्ही दिलेल्या झाडांना फळे धरल्याचे निरोप येतात, तेव्हा फार भारी वाटतं. पिटेझरी, आतेगाव, थाडेझरी, धानोरी, चोरखमारा, भिवसन टोला, मालुटोला, कवडशी, खैरी, निप्परटोला, परसटोला, खांबा, येटेवाई, जांभळी, गिरोला, गोरेगाव (कुऱ्हाडी), रुस्तमपूर, दुधारा (चंद्रपूर), वलमाझरी, पिंडकेपार अशी लाभार्थी गावांची यादी दिवसेंदिवस वाढत आहे. फोन न करता थेट आमच्या घरी येऊन झाडं मागणाऱ्या लोकांची संख्याही वाढत आहे. काही गावांमध्ये लोकांना शेकड्यानं झाडं देण्यात आली आहेत. तर काही गावांतील लोकांनी सुरुवात करायची म्हणून चार-चार, पाच-पाच झाडं नेली आहेत.



**फणसाचं झाड लावताना एका गोंड महिलेसह सौ. अनघा किरण पुरंदरे**

आपले गोंड बांधव अशा झाडांना 'खावटीची झाडा' असं म्हणतात. खावटीची झाडा म्हणजे फळं देणारी, खायला देणारी, खाण्याची झाडं.

दरम्यान, आम्ही ६१५ लोकसंख्या असलेल्या पिटेझरी या गावाची पाहाणी केली. मागच्या वर्षी दिलेल्या ३०० झाडांपैकी २१० झाडं लोकांनी जगवली आहेत. हे प्रमाण ७० टक्के एवढं आहे. शेळीनं तोंड लावलं,

उधई धावली, प्रधानमंत्री आवास योजनेमुळे जगवलेली झाडं तोडावी लागली (कारण घर बांधायला जागा नव्हती म्हणून), वानरं घरांवर उड्या ठोकून कौलं फोडतात म्हणून झाड तोडलं, गाईढोरांच्या टापांखाली रोपटं चिरडलं गेलं, धुऱ्यावरचं गवत कापण्याच्या धुंदीत लावलेलं रोपंच उडवलं अशा कारणांमुळे झाडं जगली नाहीत. चालू वर्षी पिटेझरी गावात ३०० झाडं वाटण्यात आली आहेत. आमच्या रोपवाटिकेत माळीबुवा म्हणून पूर्ण वेळ काम करणाऱ्या सेवकराम डुकरू टेकाम यांनी सांगितलं की, या गावातील लोकांना दिलेली झाडं त्यांनी लावली आहेत.

'पौष्टिक मूल्यांसाठी वनस्पती संवर्धन' या प्रकल्पाच्या अंतर्गत सुरू असलेला वृक्ष-भेट उपक्रम म्हणजे एक आनंदयात्रा आहे. या उपक्रमामुळे आमची अक्षरशः हजारो लोकांशी मैत्री झाली आहे. आम्ही एखाद्या गावातल्या गुजरीत (संध्याकाळचा बाजार) भाजी वगैरे घ्यायला गेलो की एखादी हाक कानांवर येते -

'अजी पुरंदरेकर सायेब आमाला झाडा भेटतील का जी? तुमी लोकान्ले रंगारंगाची झाडा देता मग आमाला पन देजाल!'

उत्स्फूर्तपणे माझं आडनाव बदलून झाडांची मागणी करत तोंडभर हसणाऱ्या त्या अनोळखी व्यक्तीशी मैत्रीचा धागा जोडणाऱ्या हिरव्या दोस्तांचा विषय असा कुठेही निघतो. गुजरीत, बाजारवाडीत, नाक्यावर, कोपऱ्यावर, रस्त्यावर, चहाच्या ठेल्यावर....

आम्ही दिलेल्या झाडांची फळं लोकांनी चाखायला सुरुवातदेखील केली आहे. सौ. शोभा उमराज नेवारे (राहणार पिटेझरी) यांनी आमच्या घरी शेवग्याच्या ताज्या शेंगांचा जुडगा आणून दिला, तेव्हा सौ. अनघाचा चेहेरा कमळासारखा फुलला. दहा-बारा शेंगा आणि आभाळभर आनंद. फक्त शेवगाच नाही तर लिंबू, पेरू, फणस (सुमारे १२ वर्षांपूर्वी लावलेलं झाड) या झाडांनी फळं द्यायला सुरुवात केली आहे. ही झाडं केवळ माणसाला आधार देत आहेत असं नाही.

आम्ही पशुपक्षी डोळ्यांपुढे ठेवून काही झाडं लावली आहेत. याच वर्गातल्या कडुनिंबावर पिकलेली फळं चाखायला कीर पोपट (Rose-ringed Parakeet) आणि राखी धनेश (Indian Grey Hornbill) येत आहेत. फणसाचं झाड खार बुलबुल (White-browed Bulbul) या पक्ष्याचा रातथारा (roost) झाला आहे. एक खार बुलबुल रात्रीची नीज घेण्यासाठी झाडावर येतो. फणसाची घसघशीत पानं पावसाळी दिवसांमध्ये त्याच्या छत्र्या होतात. जुलै महिन्याच्या शेवटी या झाडावरून 'धबाक्!' असा आवाज करत एक पिकलेला फणस खाली पडला आणि फुटला. बरका प्रकारच्या फणसाच्या गऱ्यांमधला गोड रस पिण्यासाठी एक सांजपरी (Common Evening Brown) हे फुलपाखरू आलं होतं. (बरं का!)

कागदी लिंबाच्या झाडावर तर धमाल असते. राणी पाकोळी (Blue Mormon), बहुरूपी (Common Mormon), लिंबाळी (Lime Butterfly) ही फुलपाखरं लिंबाच्या कोवळ्या फुटीवर अंडी घालत आहेत. आमच्या पिटेझरी गावातच चिमुकल्या ठिमूनं [ ठिपकेवाला मुनिया (Scaly-breasted Munia) या पक्ष्याचं मी ठेवलेलं टोपण नाव] सापेला गवताची पाती वापरून 'साई सरबती' या नागपूरच्या राष्ट्रीय लिंबुवर्गीय संशोधन संस्थेतून आणलेल्या झाडात चेंडूसारखं घरटं तयार केलं. लिंबाला इकडे 'लिंबोनी' म्हणतात. त्याला काटे असल्यामुळे पक्ष्यांच्या घरट्यांचं संरक्षण होतं. काही पक्षी पक्षी-थांबा (perch) म्हणून लिंबाच्या झाडाच्या बाहेर आलेल्या फांद्यांचा वापर करतात.

कुठे एखादा पिटुकला शिंजीर (Purple-rumped Sunbird) शेवग्याच्या नाजूक फुलोऱ्यात त्याची बाकदार

घाबरटाला सारेच अशक्य असते.

चोच घालताना दिसत आहे. शेवग्याच्या झाडावर हिमालयातून येणारा पर्ण वटवट्या (Greenish Warbler) हा पक्षी किडे खाण्यासाठी नियमितपणे भेट देत आहे. शेवग्याच्या झाडावर चिमणा सुतार (Brown-capped Pygmy Woodpecker) तर अक्षरशः अपॉईंटमेंट घेतल्यासारखा बघता येतो.

शेवग्याचं झाड ठिसूळ असतं. विशेषतः कोणतीही वठलेली फांदी टोकरायला आणि पोखरायला सोपी असते. पिटुकल्या (लांबी फक्त १३ सेंमी., म्हणजे चिमणीपेक्षा लहान!) सुताराची आणि शेवग्याची गट्टी जमते ती याच कारणानं.

तो झाडाच्या फांद्यांवर उलटसुलट लटकत, वळसे मारल्यासारखा सरसरत, खाली-वर करत अशक्त जागा शोधून काढतो आणि किडीचा फडशा पाडतो. दुपारच्या वेळी मालकानं पाय जरा लांब केले की, टमटमीत पेरूवर शाळूचोर हिरवे रावे उतरत आहेत. कधी समाधानाचे तर कधी लाडिक आवाज काढत कच्चेबच्चे, पाडाला आलेले आणि पिकलेले पेरू खात आहेत. पोपटांची धाड पडलेल्या अशा एखाद्या झाडाच्या भोवती पिकलेल्या पेरूंचा गंध भरून राहिलेला असतो. अर्धवट खाल्लेले, चोची लावलेले पेरू झाडाखाली पडलेले दिसतात. पेरूला फुलं आली रे आली की, फुलोरी मधमाश्यांची ये-जा सुरू होते.



पिकलेल्या पेरूसाठी आलेला रेषाळ फुलटोचा

कधी कधी फळझाडांची रोपं घेऊन एखाद्या गावाला जाण्यासाठी येणारा डग्गा अगदी सकाळीच घरघरत आमच्या गावात येतो. मी नर्सरीचं दार उघडतो. नर्सरीच्या ओल्या मातीवर पाय ठेवताच आपल्या जन्माचं सार्थक झालं असं वाटतं. लोकांना भेट द्यायची रोपं उचलून डग्ग्यात भरायला सेवकभाऊ आणि मी असे दोघंच असतो. दोन हातांनी दोन नारळांची झाडं उचलताना पाठीत येणारी कळ सहन करण्याची ताकद नारळाची झाडंच देतात. त्यांच्या करकरीत पानांवर साचलेलं दव अंगावर पडतं व वेदना दूर करतं.

नर्सरीतली रोपं माहेरपणाला आल्यासारखी वाटतात. त्यांच्याकडे नुसतं पाहिलं, तरी किती बरं वाटतं. त्यांना बाहेर पाठवताना मन जड होतं. गावातून बाहेर पडणारा डग्गा दिसेनासा होईपर्यंत मी त्याच्याकडे पाहात राहतो. तोपर्यंत घामात चिंब भिजायला झालेलं असतं. आंघोळ करत असताना पायाच्या नखांमध्ये अडकलेली नर्सरीतली माती तशीच असू द्यावी असं वाटतं.

या उपक्रमाचं वैशिष्ट्य म्हणजे आम्ही लोकांकडे जातो. त्यांच्या दारांमध्ये जातो. त्यांच्याशी संवाद साधतो. माणसाला अन्न, थोडं-फार उत्पन्न आणि जीवविधतेचा सांभाळ. झाडं काय कमाल करतात बघा. जशी झाडं महान आहेत, तसेच लोकंही महान आहेत. हिरव्या मित्रांनी डोलणारी रसरशीत शिवारं हेच आमचं सगळ्यांचं स्वप्न आहे. या स्वप्नाच्या वाटेवर भेटलेल्या हजारो लोकांना शतशः प्रणाम. फळांनी लगडलेली झाडं हातचं काहीही राखून न ठेवता अवघा ऐवज माणसाच्या पदरात टाकतात, तरीही खाली झुकतात. आपल्या हातून कितीही मोठं काम झालं, तरी झुकायचं असतं ही शिकवण झाडांकडून घ्यावी !

**श्री. किरण वसंत पुरंदरे**
भ्रमणध्वनी : ९७६५८१८८२५

●●●

शहाणा माणूस चुका विसरतो, पण त्याची कारणे नाही विसरत.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

शैक्षणिक वर्ष २०२२ - २०२३ अतिशय उत्साहात सुरू झाले. जवळपास २ वर्षांनी जून महिन्यात शाळेची सुरुवात होणार यासाठी सर्वच आनंदात होते.

**१३ जून २०२२ –** नर्सरी विभागात प्रवेश घेतलेल्या तसेच ज्युनियर व सिनीयर मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या पालकांकरता 'गार्गी सभागृहात' परिचयात्मक सभेचे (Orientation program) आयोजन केले होते. या सर्वांना सौ. अपर्णा वरुडकर (पूर्व प्राथमिक विभागाच्या प्रमुख) यांनी 'विद्या प्रसारक मंडळ', विविध संस्थांची ओळख पालकांना करून दिली. शाळेच्या डीन मॅडम सौ. कालिंदी कोल्हटकर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. अस्मिता मोहिले, पर्यवेक्षक प्रियांका भांगले आणि प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. अंजना कपूर यांचा पालकांना परिचय करुन दिला. या सर्वांच्या मार्गदर्शनाने व सहकार्याने होणाऱ्या शाळेच्या प्रगतीचा आलेख, शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती पालकांना सचित्र करुन दिली. यानंतर कॉफीचा आस्वाद घेऊन पालकांनी पूर्व प्राथमिक विभागाचे वर्ग व शिक्षक यांना भेट दिली.

**१५ जून २०२२ –** नर्सरी, ज्युनियर व सिनीयरच्या मुलांच्या शाळेचा पहिला दिवस उत्साहात पार पाडला. नवीन शाळा, वर्ग, शिक्षक या सर्वांशी जुळवून घेताना सर्वांनीच थोडा वेळ घेतला.

**२ जुलै २०२२ –** नर्सरी, ज्युनियर व सिनीयरच्या पालकांची या वर्षीची पहिली पालक सभा घेण्यात आली. मुलांची प्रगती, शाळेतील अभ्यासक्रम, दिनक्रम याबद्दल पालकांना माहिती देण्यात आली, तसेच प्रत्येक गटाचा एक याप्रमाणे पालक प्रतिनिधींची नियुक्ती झाली.

**८ जुलै २०२२ – आषाढी एकादशी**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने सिनीयरच्या मुलांना नारळाच्या करवंटीत बिया रुजवायचा उपक्रम देण्यात आला होता. रुजलेली छोटी रोपटी घेऊन सिनीयरची मुले शाळेत आली. नर्सरी, ज्युनियर व सिनीयरची मुले पारंपरिक वेशभूषा करून आली होती.

विठ्ठलाच्या फोटोभोवती गाणी म्हणत, विठुरायाचा गजर करत, नर्सरी व ज्युनियरच्या मुलांनी आषाढी साजरी केली. तर सिनीयरच्या मुलांनी, त्यांनी रुजवलेली छोटी रोपटी घेऊन विठुरायाचा गजर केला. सिनीयर के. जी. तील अनन्या पाटकर हिने तुळशीचे औषधी उपयोग तर सागर राव ह्याने 'नारळाचे झाड - कल्पवृक्ष' याबद्दल सर्वांना थोडक्यात माहिती दिली. सर्वांना साखरफुटाण्याचा प्रसाद देण्यात आला.

**१३ जुलै २०२२ – गुरुपौर्णिमा**

आषाढ महिन्यात येणारी पौर्णिमा गुरुपौर्णिमा म्हणून साजरी केली जाते. प्रथम गुरू आई नंतर वडील व मग शिक्षक या सर्वांप्रती आदर व्यक्त करण्याचा दिवस. याचे महत्त्व शिक्षकांनी मुलांना समजावून सांगितले.

**इतर काही उपक्रम :-**

- मुलांना स्वावलंबी करण्याच्या उद्देशाने कपड्यांच्या घड्या घालणे, शर्टाची बटणे लावणे, स्वत:ची शाळेची बॅग भरणे असे उपक्रम घेतले गेले.

मुलांच्या सूक्ष्म तसेच स्थूल स्नायूंच्या विकासाला उपयोगी असे कागदाचे तुकडे करणे, कागदावर खडूने रेघोट्या मारणे, रवीच्या साहाय्याने साबणाचे पाणी घुसळणे, विविध आकाराच्या ब्रशने रंगवणे, ठसे काम, रांगोळी काम असे अनेक उपक्रम घेतले गेले.

- अभ्यासक्रमात असलेले काही विषय व त्या संबंधित सचित्र माहिती देण्यासाठी चित्रप्रक्षेपण यंत्र (projector) व लॅपटॉप या आधुनिक यंत्रांचा वापर आठवड्यातील दर शुक्रवारी केला जातो.
- अभ्यासाबरोबर मुलांना पुस्तके वाचणे, गाणी, गोष्टी यांची आवड निर्माण व्हावी, गोडी लागावी यासाठी प्रत्येक आठवड्याला एक तासिका याप्रमाणे आखणी केली जाते.
- संपूर्ण वर्षभर दर आठवड्यातील शुक्रवारी सिनीयर के. जी. ला एक कार्यपत्रिका (worksheet) मुलांना शाळेत सोडवण्यासाठी दिली जाते, तर ज्युनियरच्या विद्यार्थ्यांसाठी शाळेच्या संकेत स्थळावर (वेबसाईटवर) तसेच व्हॉट्स अप ग्रुपवर अपलोड केली जाते. ज्यात इंग्रजी, गणित व परिसर अभ्यास या विषयांतर्गत शिकवण्यात आलेल्या संकल्पनांची उजळणी करणे हा उद्देश असतो.
- **बनी टमटोला –**

  पूर्व प्राथमिक विभागात घेतल्या जाणाऱ्या स्काऊटच्या विभागाला 'बनी टमटोला' म्हणतात. दर बुधवारी सर्व विद्यार्थी 'बनी'चा ॲप्रन घालून येतात. सणांचे महत्त्व, चांगल्या सवयी, बागकाम, गाणी, गोष्टी असे अनेक उपक्रम वर्षभर या अंतर्गत घेतले जातील.

अशा प्रकारे आभासी शाळा संपवून यावर्षीपासून पुन्हा एकदा प्रत्यक्ष शालेय दिनक्रमाला सुरुवात झाली.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

### २१ जून २०२२ – आंतरराष्ट्रीय योग दिन

२१ जून हा दिवस जगभरात आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा केला जातो. निरोगी आयुष्यासाठी योगासन अतिशय महत्वाचे आहे.

सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मिडियम शाळेच्या प्राथमिक विभागातील १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी २१ जून २०२२ रोजी योग दिन साजरा केला. या दिवशी विद्यार्थ्यांनी विविध आसने सादर केली. उदा. ताडासन, वज्रासन, पादहस्तासन, त्रिकोणासन.

तसेच शिक्षकांनी विद्यार्थ्यांना योगासनांचे फायदे समजवून दैनंदिन जिवनात योगासन करण्यासाठी प्रोत्साहन दिले.

आध्यात्मिक व शारीरिक सरावाच्या फायद्याबद्दल जागरूकता पसरवणे हा या कार्यक्रमाचा उद्देश होता. सर्व विद्यार्थ्यांनी 'योगदिन' मोठ्या उत्साहाने साजरा केला.

### ८ जुलै २०२२ – आषाढी एकादशी उत्सव

८ जुलै रोजी सौ. आनंदीबाई केशव जोशी इंग्लिश मिडियम शाळेत इयत्ता १ली ते ४थी च्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी सण मोठ्या आनंदाने साजरा केला.

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्सवाची माहिती दिली, विविध गाणी गायली. तसेच भजन कीर्तन सादर केले. तसेच इयत्ता ४थी च्या विद्यार्थ्यांनी एक नाटुकली सादर करून दिंडीची मिरवणूक काढली. नाटुकलीत आजच्या सद्य:परिस्थितीचा, ऑफलाईन–ऑनलाईन शाळेचा विद्यार्थ्यांवर तसेच समाजावर कसा परिणाम झाला याचे सादरीकरण केले. विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे व उत्साहाचे वातावरण पाहावयास मिळाले.

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

### शिवस्वराज्य दिन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग अंतर्गत विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी बेडेकर महाविद्यालय, बांदोडकर महाविद्यालय आणि टीएमसी विधी महाविद्यालय यांच्या तर्फे शिवस्वराज्य दिन सोहळ्यानिमित्त जिल्हास्तरीय कार्यक्रम सोमवार, दिनांक ६ जून २०२२ रोजी पार पडला.

६ जून १६७४ रोजी महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक रायगड किल्ल्यावर पार पडला होता. ती आठवण जागृत ठेवण्यासाठी ठाण्यात आज शिवज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. मासुंदा तलावाच्या परिसरात असणाऱ्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून या रॅलीची सुरुवात झाली. २०० हून अधिक एनएसएसच्या विद्यार्थिनी शिवज्योत रॅलीत सहभागी झाल्या असून सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य शिवज्योत रॅलीत उपस्थित होते. प्रभात फेरीत के बी कॉलेज ऑफ कोपरीमधील विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.



सर्व विद्यार्थी पारंपरिक वेशात शिवज्योत रॅलीत सहभागी झाले होते. मासुंदा तलावापासून सुरू झालेल्या शिवज्योत रॅलीची सांगता जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या ज्ञानदीप पटांगणात झाली. यानंतर महाविद्यालयाच्या पाणिनी सभागृहात कथाकथन, पथनाट्य, समूह नृत्य असे कार्यक्रम पार पडले. या कार्यक्रमांसाठी ठाणे जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर, क्विक रिस्पॉन्स टीमचे एसीपी राजू पाटील, इतिहास लेखिका व लघुपट निर्मात्या स्वाती इंदुलकर, उच्च शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांचे प्रतिनिधी ज्ञानदा कदम, विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, प्राचार्य डॉ. नितीन जोशी, प्राचार्या डॉ. विद्या जयकुमार, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, इतर मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहिले होते. कॅप्टन बिपिन धुमाले, एन.एस.एस ऑफिसर प्राध्यापक सुदाम अहिरराव आणि शिक्षिका रोहिणी यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. डॉ. दीपक साबळे, माधवी जोशी यांचे सहकार्य लाभले व महाविद्यालयाच्या एन.सी.सी आणि एन.एस.एस.च्या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी सांभाळली होती.

**जोशी–बेडेकर महाविद्यालयात शब्दकोशांचे प्रदर्शन**

विद्या प्रसारक मंडळ संचलित जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या वतीने स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि ठाणे महानगरपालिकेच्या विद्यमाने सुरू असलेल्या उत्सव ७५ च्या अंतर्गत शब्दकोशाचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस आर रंगनाथन आणि भारतीय ग्रंथपाल दिनाचे औचित्यदेखील या ग्रंथप्रदर्शनामागे आहे . विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ विजय बेडेकर यांच्या प्रेरणेने भरविलेल्या या प्रदर्शनाचे उद्घाटन जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते शुक्रवार दिनांक १२ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी दहा वाजता करण्यात आले.



या प्रदर्शनाच्या उदघाटन प्रसंगी बोलताना प्राचार्या नाईक म्हणाल्या की, 'शिक्षण आणि संशोधनामध्ये विविध प्रकारच्या शब्दकोशांना अतिशय महत्त्व आहे. एखाद्या भाषेतील वापरात असलेल्या तसेच वापरातून गेलेल्या अशा यच्चयावत शब्दांचा संग्रह शब्दकोशांमध्ये असतो. शब्दांचा अर्थ समजावा आणि जिज्ञासूची शब्दशक्ती वाढावी, हा एक हेतू शब्दकोशरचनेमध्ये असतो'. पुढे त्या म्हणाल्या की, शब्दकोशामुळे मूळ

शब्द व त्याचा अर्थ समजण्यास मदत होते. शब्दकोशामध्ये सामान्यतः शब्द, त्याचा अर्थ, त्या शब्दाचा प्रतिशब्द, तसेच इष्ट तेथे अर्थाचे अधिक विशदीकरण दिलेले असते. सर्वच विषयांचा त्याचप्रमाणे विविध वाङ्मयांचा अभ्यास करण्यासाठी शब्दकोश महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले.

या प्रदर्शनामध्ये मराठी इंग्रजी, हिंदी आणि संस्कृत भाषेतील ४०० शब्दकोशांचा समावेश आहे. २० खंडांमध्ये असलेली ऑक्सफर्ड इंग्लिश डिक्शनरी, मोलसवर्थचा शब्दकोश, ऑक्सफर्ड ने ६० खंडांमध्ये प्रकाशित केलेला चरित्रात्मक शब्दकोश, पाल्ग्रेव्हचा अर्थशास्त्र शब्दकोश, संज्ञा संकल्पना कोश त्याचप्रमाणे विविध विषयांसाठी असलेले शब्दकोश, महाराष्ट्र शासनाने प्रकाशित केलेले सर्व परिभाषा कोश, शासन व्यवहारकोश इत्यादी महत्त्वपूर्ण शब्दकोश हे या प्रदर्शनाचे वैशिष्ट्य आहे.

या प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, डॉ. महेश पाटील, डॉ. प्रियंवदा टोकेकर, हर घर तिरंगा आणि स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव समितीचे समन्वयक डॉ. दीपक साबळे, सर्व विभाग प्रमुख, सर्व ग्रंथालय कर्मचारी आणि ग्रंथालय शास्त्राचे विद्यार्थी उपस्थित होते. ग्रंथपाल नारायण बारसे यांनी प्रदर्शनाची भूमिका विशद करून सर्वांचे स्वागत केले.

हे शब्दकोश प्रदर्शन शनिवार दि १३ ऑगस्ट पर्यंत सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सर्व ठाणेकरांसाठी खुले असणार आहे असे ग्रंथपाल नारायण बारसे म्हणाले.

### करिअर मार्गदर्शन व्याख्यान १ जुलै २०२२

जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र या विभागाच्या संयुक्त विद्यमाने १ जुलै २०२२ रोजी करिअर मार्गदर्शन व्याख्यान संपन्न झाले. कु. सुभाषिनी सिंग यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी प्रेरित केले, तसेच तृतीय वर्षानंतर विद्यार्थ्यांसाठी खुल्या असलेल्या विविध मार्गांवर चर्चा केली, त्याचबरोबर परदेशात पीएचडीकरिता अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व्याख्यानाच्या शेवटी एक प्रश्न उत्तर सत्र आयोजित केले गेले ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या शंकांचे निराकरण करण्यात मदत झाली. या व्याख्यानाला द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र या विभागाचे ७० विद्यार्थी उपस्थित होते.



२ जुलै २०२२ रोजी करिअर मार्गदर्शन व्याख्यान संपन्न झाले. डॉ. जयश्री पवार, साहाय्यक प्राध्यापक, जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र विभाग यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी प्रेरित केले, तसेच विविध स्पर्धा परीक्षांचे तपशीलवार वेळापत्रक, त्यांचे नमुने यांवर मार्गदर्शन केले. या व्याख्यानाला द्वितीय वर्ष व तृतीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते.

### पालक - शिक्षक सभा २ जुलै २०२२

जैवतंत्रज्ञानव सूक्ष्मजीवशास्त्र या विभागाच्या संयुक्त विद्यमाने २ जुलै २०२२ रोजी पालक - शिक्षक सभा संपन्न झाली. या सभेला द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र या विभागाचे विद्यार्थी व पालक उपस्थित होते.



या सभेमध्ये आगामी विभागीय उपक्रमांची जाणीव पालकांना करून देण्यात आली. दरवर्षी होणाऱ्या उपक्रमांचे प्रकारही पालकांना सांगितले गेले. या सभेला प्राचार्य डॉ. मोजेस केलेट व दोन माजी विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते. या सभेला एकूण ८८ पालक उपस्थित होते.

**EPIGENETICS PREPATORY SESSION**

जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र या विभागाच्या संयुक्त विद्यमाने १८ जुलै २०२२ रोजी डॉ. वा ना बेडेकर व्याख्यानमालेनिमित्त आयोजित Epigenetics And Cancer व्याख्यानाचे पूर्व तयारी सत्र संपन्न झाले. या व्याख्यानाला द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र या विभागाचे ४६ विद्यार्थी उपस्थित होते.

**डॉ. वा ना बेडेकर व्याख्यानमाला**



जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र या विभागाच्या संयुक्त विद्यमाने १९ जुलै २०२२ रोजी स्वर्गीय डॉ. वा ना बेडेकर व्याख्यानमालेनिमित्त Epigenetics And Cancer या विषयावर डॉ. संजय गुप्ता, मुख्य अन्वेषक, ACTREC



यांचे व्याख्यान संपन्न झाले. डॉ. संजय गुप्ता यांनी विद्यार्थ्यांना एपिजेनेटिक - संशोधनाबद्दल मार्गदर्शन केले. या व्याख्यानाला द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष जैवतंत्रज्ञान व सूक्ष्मजीवशास्त्र या विभागाचे ८४ विद्यार्थी उपस्थित होते.

**रक्तदान शिबिर**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना (एन. एस. एस.) आणि राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी) युनिट्सनी ठाणे सिव्हिल हॉस्पिटल रक्तपेढीसाठी ६६ रक्त युनिट जमा केले. रक्तपेढीला नुकत्याच झालेल्या रक्ताचा तुटवडा लक्षात घेऊन डॉक्टरांनी या मोहिमेचे खूप कौतुक केले.

**आंतरराष्ट्रीय खारफुटी दिन**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय येथे आंतरराष्ट्रीय खारफुटी संवर्धन दिनानिमित्त २६ जुलै २०२२ रोजी अनुबंध माजी विद्यार्थी संघटनेचे माजी अध्यक्ष, डॉ प्रसाद कर्णिक यांनी 'मॅनग्रोव्हज मॅटर' या विषयावर माहितीपूर्ण भाषण केले.

**विशेष नैपुण्य**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयतील कार्यालय कर्मचारी श्री. रामचंद्र शिंदे यांनी 'ए' ग्रेडिंगसह यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ मधून एम.बी.ए. पदवी (फायनान्स) पदवी संपादन केली आहे.

**विशेष प्रावीण्य**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयातील तृतीय वर्ष विद्यार्थी कु. ऊर्जा कुडाळकर आणि श्री. प्रणव गोहिल यांनी आंतरराष्ट्रीय खगोलशास्त्र आणि खगोल भौतिकशास्त्र अधिवेशन २०२२ मध्ये कांस्यपदक पटकावले.

**ग्रंथालय अभिमुखता सत्र**

ग्रंथालय विभागातर्फे १८ जुलै, १९ जुलै आणि २० जुलै २०२२ रोजी द्वितीय वर्ष व तृतीय वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकरिता ग्रंथालय अभिमुखता सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. ग्रंथपाल सौ. कादंबरी मांजरेकर यांनी या सत्राचे आयोजन केले होते.

या सत्रामध्ये सौ. कादंबरी मांजरेकर यांनी ग्रंथालय सेवा व सुविधा, ग्रंथालय नियम, Knimbus, पुस्तक पेढी योजना व वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. ग्रंथालयामधील विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. या सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी मोठा उत्साह दाखवला. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसनही केले गेले. सदर सत्र माहितीपूर्ण आणि समृद्ध करणारे होते.



**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय Skills and Career Opportunity for Librarians सत्र**

यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नाशिक अंतर्गत बा.ना.बांदोडकर महाविद्यालय येथे पत्रकारिता अभ्यासक्रम आणि ग्रंथालय शास्त्र अभ्यासक्रम या विद्यार्थ्यांकरिता Skills and Career Opportunity for Librarians या विषयावर दिनांक १२ जुलै २०२२ रोजी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाला प्रा. नारायण बारसे हे प्रमुख वक्ते म्हणून लाभले होते.

या सत्रामध्ये विद्यार्थ्यांनी मोठा उत्साह दाखवला. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसनही केले गेले. सदर सत्र माहितीपूर्ण आणि समृद्ध करणारे होते.

**प्रथम वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकरीता व्याख्यान**

प्रथम वर्ष विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांकरीता २२ जुलै २०२२ ते ३०जुलै २०२२ या कालावधीत इंडक्शन लेक्चर सिरीज आयोजित करण्यात आली होती. यामध्ये प्रत्येक विभागातर्फे, तसेच विविध समित्यांतर्फे आयोजित करणाऱ्या कार्यक्रमांची, विभागांची ओळख विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. महाविद्यालयातर्फे आयोजित करण्यात येणारे कार्यक्रम, संशोधनपर उपक्रम, नियम, प्रशासकीय बाबी, सेवा सुविधा, परीक्षा संदर्भात नियम, प्रात्यक्षिकांचा वेळ, कला, क्रीडा, साहित्य विषयक उपक्रम, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, डिपार्टमेंट ऑफ लाईफ लर्निंग, खेळ विभाग, सांस्कृतिक विभाग यांबाबत माहिती देण्यात आली.

**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती**

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील ग्रंथालय विभागातर्फे२३ जुलै २०२२ रोजी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक जयंती साजरी करण्यात आली. यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले व विद्यार्थ्यांना लोकमान्य बाळ गंगाधर टिळकांच्या बद्दलची माहिती देण्यात आली.



## विद्या प्रसारक मंडळाचे
## ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### निवडणुकीचे कायदे या सर्टिफिकेट प्रोग्रामचे उद्घाटन – २ जुलै, २०२२

दिनांक २ जुलै, २०२२ ला निवडणुकीचे कायदे या सर्टिफिकेट प्रोग्रामचे उद्घाटन करण्यात आले. हा सर्टिफिकेट प्रोग्राम सत्र-२ च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी आहे.

### तीन वर्ष एल.एल.बी.च्या विद्यार्थ्यांसाठी सुधारित अभ्यासक्रम

२०२२-२३ च्या शैक्षणिक वर्षापासून मुंबई विद्यापीठाने तीन वर्ष एल.एल.बी.च्या विद्यार्थ्यांसाठी सुधारित अभ्यासक्रम जाहीर केला. ह्याची अंमलबजावणी २०२२-२३ पासून होणार आहे.

### रिफ्रेशर कोर्स



प्रा. विनोद एच. वाघ यांनी डॉ. हरिसिंग गौर विद्यापीठ, सागा, इंडिया यु. जी. सी. एचआरडीसीद्वारे ४ जुलै ते १६ जुलै दरम्यान आयोजित इमर्जिंग ट्रेण्डस इन लॉ: इंटरनॅशनल अँड नॅशनल परस्पेक्टिव्ह या विषयावरील ऑनलाइन रिफ्रेशर कोर्स यशस्वीपणे पूर्ण केला.

### २०२१-२०२२ द्वितीय वर्ष विधीचा निकाल

२०२१-२०२२ द्वितीय वर्ष विधीचा निकाल ६ जुलै, २०२२ रोजी जाहीर झाला. यात ९२% विद्यार्थी यशस्वी झाले. मे २०२२ द्वितीय वर्ष विधीचे निकाल पुढीलप्रमाणे-

### मे २०२२ – ६०:४० पॅटर्न निकाल

- प्रथम क्रमांक – मिस. प्रियांका मिलिंद आचार्य – ३७९/५०० गुण
- द्वितीय क्रमांक – मिस. भाग्यश्री मिलिंद आचार्य – ३७६/५०० गुण

### मे २०२२ – १०० गुण मिक्स पॅटर्न निकाल

- प्रथम क्रमांक – मिस. कृतिका उदय साठे – ६२२/१००० गुण
- द्वितीय क्रमांक – जयप्रकाश रामचरित्र सिंग – ५६८/१००० गुण

### सत्र एकचा निकाल

सत्र एकचा निकाल २९ जुलै २०२२ रोजी जाहीर झाला. महाविद्यालयाचा निकाल सत्र एक मध्ये ८३% लागला. सत्र एकचा निकाल पुढीलप्रमाणे आहे.

- प्रथम क्रमांक – जुईली सतीश केटवाणी – ३८९/५०० गुण
- द्वितीय क्रमांक – नीलाक्षी मनोजकुमार त्रिपाठी – ३८१/५०० गुण

### मुंबई विद्यापीठाच्या नवीन इमारतीचा उद्धाटन समारंभ

८ जुलै २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता महामहिम राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी यांच्या हस्ते मुंबई विद्यापीठाच्या नवीन इमारतीच्या उद्धाटन समारंभात प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार सदर कार्यक्रमामध्ये उपस्थित राहून नंतर महाविद्यालयामध्ये आल्या.



### न्यायालय विभागाची परीक्षा – ९, १० जुलै, २०२२

आमचे विधी महाविद्यालय दिनांक ९ आणि १० जुलै, २०२२ ला न्यायालय विभागाच्या परीक्षेचे केंद्र होते.

### शैक्षणिक वर्ष २०२२ – २०२३

११ जुलै २०२२ पासून तृतीय वर्ष विधीच्या विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली. २२ जुलै २०२२ पासून तृतीय वर्ष विधीचे वर्ग नियमितपणे सुरू झाले.

**पॅरा लीगल व्हॉलेंटीयर प्रशिक्षण**

२१ जुलै २०२२ रोजी ठाणे जिल्हा विधी साहाय्य कार्यालयातील पॅरा लीगल व्हॉलेंटीयर प्रशिक्षण घेण्यासाठी आमच्या विधी महाविद्यालयातील ४० विद्यार्थी उपस्थित होते.



११ जुलै २०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता डॉ. वी. एन. जगताप यांनी नवीन शैक्षणिक धोरण, २०२० यावर मार्गदर्शन केले. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार, प्रा. हेतल मिशेरी, ग्रंथपाल मिसेस. शितल सोनावणे यांनी सदर कार्यक्रमास उपस्थिती दर्शविली.

**नवीन शैक्षणिक धोरण, २०२० कार्यशाळा**

प्रा. विनोद एच. वाघ यांनी २२ जुलै २०२२ रोजी सर्व विद्या प्रसारक मंडळाच्या शिक्षकांसाठी डॉ. वा. ना. बेडेकर इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज यांनी आयोजित केलेलेल्या नवीन शैक्षणिक धोरण २०२० मधील कार्यशाळेला हजेरी लावली.



२ जून २०२२ रोजी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांना भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र सरकारने स्थापन केलेल्या समर्पित आयोगासमोर त्यांचे विचार मांडण्याची दुर्मीळ संधी मिळाली. 'राजकीय मागासलेपणाची संकल्पना आणि त्याचे परिणाम' हा लेख राजकीय मागास आयोगाने आयोजित केलेल्या एका दिवसाच्या वेबिनारमध्ये सादर करण्यात आला. स्थानिक संस्था निवडणुकीत ओबीसींच्या आरक्षणाच्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी मार्चमध्ये सहा सदस्यीय आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. आयोगाचा अहवाल हा जुलै २०२२ मध्ये सुप्रिम कोर्टाने स्वीकारला आहे. सिद्धयोग विधी महाविद्यालय, खेड येथील प्राचार्या आणि शिक्षकेतर कर्मचारी यांची महाविद्यालयास भेट.

आमच्या विधी महाविद्यालयामध्ये सिद्धयोग विधी महाविद्यालय, खेड येथील प्राचार्या श्रीमती प्रीती मॅडम आणि त्यांचे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी हे महाविद्यालय प्रशासन कशा प्रकारे काम करते याची माहिति घेण्यासाठी आले होते. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी त्यांना योग्य प्रकारे मार्गदर्शन केले. तसेच ग्रंथपाल मिसेस शितल सोनावणे यांनी ग्रंथालयाबद्दल माहिती दिली.



## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**प्रा. डॉ. दिलीप कुमार नायक यांना शुभेच्छा**

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ. दिलीप कुमार नायक ३१ जुलै २०२२ रोजी निवृत्त होत आहेत.



कडू घोट प्रेमळ माणसाच्या हातून दिल्यास तो कमी कडू लागतो.

**प्रा. डॉ. दिलीप कुमार नायक यांना शुभेच्छा देताना विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी व्यक्त केलेल्या भावना –**

वर्गात शिकवतो तो शिक्षक, अशी शिक्षकाची सीमित व्याख्या खूप वेळा केली जाते. खरं म्हणजे शिक्षक हाही विद्यार्थ्यांचा एक पालकच असतो. शाळा, महाविद्यालयातील मुलं ही संस्कारक्षम वयातील असतात. त्यांना सक्षम, सुसंस्कृत आणि सर्जनशील नागरिक बनवायचे असते. शाळा, महाविद्यालयातील प्रत्येक क्षण हा त्याकरता उपयोगात येत असतो. पुस्तकाइतकेच शिक्षकाचे वागणे-बोलणे हेही कळत नकळत प्रत्येक विद्यार्थ्यावर असे संस्कार करतच असते. म्हणूनच घरात पालक आणि शाळा-महाविद्यालयात शिक्षकांवर याची मोठी जबाबदारी असते. प्रसंगी या करता अप्रियताही घ्यायला लागते, तर वेळप्रसंगी मायाही द्यावी लागते.

प्रा. नायक हे या पठडीतील शिक्षक आहेत आणि मंडळ या बाबतीत खरोखरच खूप श्रीमंत आहे.

१९८५ ते २००४ पर्यंत प्राध्यापक आणि २००४ पासून आजपर्यंत म्हणजे गेली १८ वर्षे तंत्रनिकेतनचे प्राचार्य पद ते समर्थपणे सांभाळत आहेत.

त्यांचा या ३७ वर्षांच्या मोठ्या कालखंडामध्ये त्यांनी आपल्या तंत्रनिकेतनला शैक्षणिक प्रतिष्ठा मिळवून दिली आहे. २००९ आणि २०१५ चे आयएसटीई नर्सिमोंजी नॅशनल अवॉर्ड तसेच २००९ आणि २०१७ चे आयएसटीईचे बेस्ट चाप्टर ऑफ महाराष्ट्र असे पुरस्कार त्यांनी प्राप्त करून दिले आहेत. तसेच त्यांनी मंडळाच्या इतर संस्थाच्या प्रगतीमध्येदेखील मोलाचे मार्गदर्शन केले आहे. त्यांचे मंडळाशी व मंडळाच्या इतर संस्थांचे प्राचार्य, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्याशी सलोख्याचे संबंध आहेत.

आज जरी ते निवृत्त झाले असले, तरी त्यांची सेवा यापुढेही अशीच चालू राहील. विद्या प्रसारक मंडळ त्यांचे हे योगदान कायम स्मरणात ठेवेल. मंडळाने त्यांची प्राचार्य म्हणून सेवा चालू ठेवली आहे.

त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मंडळातर्फे त्यांना अनेक शुभेच्छा !

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

१ जुलै : ब्रिम्सच्या प्राध्यापकांसाठी 'टिचिंग अँड डेव्हलपिंग केसेस' या विषयावर प्राध्यापक विकास कार्यक्रमाचे (FDP) आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी जेबीआयएमएसचे संचालक डॉ. श्रीनिवासन यांना आमंत्रित करण्यात आले होते.



१ जुलै : डॉ. व्ही एन ब्रिम्सतर्फे एमबीए आणि एमएमएस प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी सीईटीची पूर्वतयारी/मार्गदर्शन या विषयावर विनामूल्य सत्रांचे आयोजन केले गेले. प्रत्येक आठवड्याला एक सत्र याप्रमाणे दिनांक १, ८, १६, २२ आणि ३० जुलै रोजी अशी एकूण ५ सत्रे घेण्यात आली.





२ जुलै : आय. आय. टी. मुंबईचे डॉ. बी. एन. जगताप यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीवरील सत्र: शैक्षणिक आणि संरचनात्मक चौकट या विषयावर व्याख्यान सादर केले.

२ ते ५ जुलै : डॉ. स्मिता जपे यांनी ए.बी.डी.सी. अनुक्रमित नियतकालिक 'इंडियन जर्नल ऑफ फायनान्स अँड बँकिंग' (IJFB) साठी शोधनिबंधांचे समीक्षण पूर्ण केले.

८ जुलै : डॉ. नितीन जोशी यांनी MCGM म्युनिसिपल कॅपेसिटी बिल्डिंग अँड रिसर्च सेंटर (MCMCR) अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रम तसेच इतर संसाधने (Resources), संशोधन सहकार्य इत्यादी संदर्भात, बृहन्मुंबई महानगरपालिकेशी संबंधित शासकीय अधिकारी श्री. प्रकाश शिरसाट यांची भेट घेतली.



८ जुलै : डॉ. नितीन जोशी यांनी YGROO चे ग्लोबल सेल्स अँड पार्टनरशीप विभागाचे प्रमुख श्री. गेव पटेल यांची भेट घेतली व YGROO सह लर्निंग मॅनेजमेंट प्लॅटफॉर्मसाठी सहकार्य चर्चा केली. हे व्यासपीठ विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रगत अभ्यासक्रम मिळवून देईल आणि त्यांना अधिक सुलभ, किफायतशीर आणि समावेशी बनवेल.

८ जुलै : डॉ. पंकज नंदुरकर आणि विद्यार्थी विकास समितीच्या सदस्यांनी ब्रिम्स कनेक्ट या मासिक कार्यक्रमाचे आयोजन केले.



११ जुलै : ब्रिम्सच्या प्रा. मुग्धा ए. भडकमकर यांनी यशस्वीरित्या वित्त (फायनान्स) या विषयात, पीएच. डी. पदवी संपादन केली याबद्दल त्यांचे अभिनंदन !!

१२ जुलै : डॉ. नितीन जोशी यांना बी.एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयामध्ये शैक्षणिक लेखापरीक्षणासाठी आमंत्रित करण्यात आले.



१२ जुलै : ब्रिम्सच्या आवारात वृक्षारोपण करण्यात आले. एकूण १२ झाडे लावण्यात आली. या कार्यक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक, आणि कर्मचारी सहभागी झाले.



१४ जुलै : डॉ. नितीन जोशी यांना गोदरेज एरोस्पेसकडून उत्कृष्टता मूल्यांकनासाठी आमंत्रित करण्यात आले.

१४ जुलै : संचालक डॉ. नितीन जोशी यांनी लिहिलेला लेख, फ्री प्रेस जर्नलच्या शैक्षणिक विभागामध्ये प्रकाशित झाला. या लेखात व्यवस्थापकांच्या यशस्वी करिअरच्या प्रवासाचे 9 C खालीलप्रमाणे नमूद केले आहेत.

Content, Concern, Craft, Character, Composure, Communication, Courage, Confident, Child-like Behavior.




१६ जुलै : राष्ट्रीय मान्यता मंडळाची (NBA) गरज लक्षात घेऊन शैक्षणिक सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली व सभा आयोजित करण्यात आली. हे मंडळ शैक्षणिक कार्यक्रमांना मदत करेल आणि सल्ला देईल सर्वोत्तम-सराव मानके हेरून काढेल आणि नवीन अभ्यासक्रम किंवा कार्यक्रम विकसित करण्यात मदत करेल.

**सल्लागार उद्योजक / व्यावसायिक -**

श्री. एस.एन. मूर्थी - (संस्थापक, KYI (Know Your Interest))

श्री. गिरीश दंडिगे - (माजी कार्यक्रम संचालक, TCS)

डॉ. (माननीय) नयन भेडा - (मालिका उद्योजक, संस्थापक, हॅशटेक व्हेंचर)

श्री. अजय रावल - (महाव्यवस्थापक (मार्केटिंग), रेमंड कंझ्युमर केअर.)




१६ जुलै : डॉ. व्ही एन ब्रिम्सतर्फे ऑनलाइन माजी विद्यार्थी संमेलन आयोजित करण्यात आले. डॉ. स्मिता जपे, डॉ. मुग्धा भडकमकर, प्रा. जान्हवी पोतदार आणि श्वेता नायर यांच्यासह माजी विद्यार्थी संघाच्या सदस्यांनी या आभासी माजी विद्यार्थी संमेलनाचे आयोजन केले. हा एक अतिशय यशस्वी कार्यक्रम ठरला.

भारत आणि आयर्लंडमधील माजी विद्यार्थ्यांसह एकूण ७८ माजी विद्यार्थी ऑनलाइन संमेलनात सहभागी झाले. या वेळी सहयोगी प्राध्यापिका डॉ. सौ. स्मिता जपे यांनी डॉ. व्ही.एन.ब्रिम्सच्या यशाबद्दल तसेच मर्मबंध असोसिएशनबद्दल आणि विविध माजी विद्यार्थ्यांनी केलेल्या विविध योगदानाबद्दल सांगितले. डॉ. पल्लवी चंदवास्कर, यांनी डॉ.व्ही.एन. ब्रिम्सच्या गुणवत्तेबद्दल आणि एनबीए मान्यता याविषयी माहिती दिली.

माजी विद्यार्थ्यांनी त्यांच्या उत्साही सहभागाने या कार्यक्रमाला चांगला प्रतिसाद दिला आणि कौतुकही केले. एमएमएसचा विद्यार्थी रोहीन, याने आपल्या काव्यमय आणि उत्कृष्ट सूत्रसंचालनाने उत्साह आणि आवड निर्माण केली आणि एमएमएस प्रथम वर्षाची विद्यार्थिनी कादंबरी हिने ब्रिम्सतर्फे सर्वांचे आभार मानले.



२१ जुलै : एन इ एन (NEN) - वाधवानी फाउंडेशन तर्फे डॉ व्ही एन ब्रिम्सच्या विद्यार्थ्यांसाठी NEN-IGNITE अभ्यासक्रमावर आधारित अभिमुखता कार्यक्रम आयोजित केला.




२१ जुलै : डॉ. कांचन यांनी ब्रिम्सच्या कर्मचारी सदस्यांसाठी 'हाऊ टू बी फिट' या विषयावर व्हीपीएम स्पोर्ट्स अकादमी आणि स्ट्रायडर्सचे प्रशिक्षक श्री. सुशील यांचे एक सत्र आयोजित केले.

STRIDERS VPM's SPORTS ACADEMY

२८ जुलै : डॉ. नितीन जोशी यांनी निधी ब्रोकिंग सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचे संस्थापक श्री. ओमप्रकाश शाही यांची भेट घेतली आणि विद्यार्थ्यांसाठी नोकरीच्या संधींबद्दल चर्चा केली.

NBS PARTNERS IN PROSPERITY

२८ जुलै : डॉ. व्ही.एन. ब्रिम्सतर्फे आझादी का अमृत महोत्सवानिमित्त 'हर घर तिरंगा' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले, बी.एन. बांदोडकर महाविद्यालयाचे प्रा. कॅप्टन बिपीन धुमाळे यांनी आपल्या व्याख्यानात भारतीय राष्ट्रध्वजाविषयी माहिती दिली व राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण, ध्वजवंदन इत्यादींचे नियम सांगितले.



२९ जुलै : विद्यार्थी विकास समिती व क्रीडा समितीतर्फे एमएमएसच्या विद्यार्थ्यांसाठी ट्रेझर हंट कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यात ८ संघ सहभागी झाले होते. नेटके आयोजन असलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्साहाने व नेटाने सर्व फेऱ्या पार केल्या.



२९ जुलै : डॉ. व्ही एन ब्रिम्सतर्फे राष्ट्रीय मान्यता मंडळाच्या (NBA) संकेतस्थळावर अर्हता पूर्व (प्री-क्वालिफायर) अहवाल सादर करण्यात आले आणि त्याला NBA ची मान्यता मिळाली.

३० जुलै : ठाकूर ग्लोबल बिझनेस स्कूल, मुंबई येथे प्राध्यापकांच्या निवडीसाठी, मुलाखत समिती सदस्य/ विषय तज्ज्ञ म्हणून डॉ. नितीन जोशी यांना आमंत्रित करण्यात आले.

Zagdu Singh Charitable Trust's (Regd.) THAKUR GLOBAL BUSINESS SCHOOL

३० जुलै : प्रा. संदीप मोघे यांनी अतिथी प्राध्यापकांसाठी LMS - InPods या सॉफ्टवेअरचे प्रशिक्षण सत्र आयोजित करून सर्व प्राध्यापकांना प्रशिक्षण दिले.




•••

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.